सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २९ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५७ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com






# जालना शहरात स्वा.सावरकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारणार- आ.खोतकर

## शहर शिवसेना शाखेच्या वतीने सावरकर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

राष्ट्रभक्तीची धगधगती ज्वाळा म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर असल्याचे प्रतिपादन आ.अर्जुन खोतकर यांनी केले. शहर शिवसेना शाखेच्या वतीने स्वा.सावरकर जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी अभिवादन कार्यक्रमानंतर आ. खोतकर बोलत होते. सावरकर प्रेमींची अनेक दिवसांपासून मागणी आहे की, सिंधी बाजार स्थित पुतळ्याचे विस्तारीकरण व सुशोभीकरण करावे. या संदर्भात आपण लवकरच मनपा आयुक्तांना सांगून शहरात योग्य जागा शोधून पूर्णाकृती उभारण्याचे काम आपण हाती घेऊ अशी ग्वाही आ. खोतकर यांनी यावेळी दिली. तत्पूर्वी सावरकर चौकातील स्वा. सावरकर यांच्या पुतळ्यास आ. खोतकर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, अभिमन्यू खोतकर, एडवोकेट भास्कर मगरे, मेघराज चौधरी,पांडुरंग डोंगरे, गणेश सुपारकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नीरज मंत्री, अंकुश पाचफुले, योगेश रत्नपारखे, गणेश राऊत, रवींद्र देशपांडे, भगवान पुराणिक, पंकज आडेकर, सतीश राजपूत, सोनू साळवे, अंकुश शितोळे, दीपक वैद्य, शुभम टेकाळे, संजय घोडे, विक्रम कुसुंदल, सागर राजपूत, दशरथ तेंडुळे, कुणाल जाधव, शिवाजी भुतेकर, गोविंद सोनवणे, दीपक हवाले, लखन कणसे, कोमल शिंदे, सुरेश मुळे, राम डोंगर, आयुष राठोड, राम भुतेकर, पांडुरंग खैरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**भास्कर दानवे यांचा सत्कार**

भारतीय जनता पक्षाच्या महानगर जिल्हाध्यक्षपदी भास्कर दानवे यांचा निवड झाल्याबद्दल त्यांचा यावेळी आ. अर्जुन खोतकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, अभिमन्यू खोतकर, अंकुश पाच फुले, संजय गायकवाड, शुभम टेकाळे, दीपक वैद्य भाजपाचे ज्येष्ठ नेते अशोक पांगारकर, सिद्धीविनायक मुळे, रवी अग्रवाल, शिवराज जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.



## संक्षिप्त

### मंठा येथील नवीन बस स्थानकात अधिकृत पेपर स्टॉलचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

मंठा शहरातील नवीन झालेल्या बस स्थानकामधील वसंतराव वाघमारे यांच्या ''वाघमारे न्युज पेपर अॅन्ड बुक स्टॉल'' चे उद्घाटन शुभारंभ ज्येष्ठ पत्रकार कृष्णा भावसार यांच्या हस्ते संपन्न झाला.

माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नतून मंठा तालुक्यासाठी भव्य बस स्टॅन्ड चे काम जवळपास पूर्ण झाले आहे.या बसस्टँड मध्ये व्यावसायिकासाठी अनेक गाळे तयार करण्यात आलेले आहेत. त्याचा लिलाव अद्याप बाकी असून प्रवाशांच्या सोयीसाठी या बस स्टॅन्ड ला अधिकृत वाघमारे पेपर एजन्सी परिवहन मंडळ विभागाकडून व बुक स्टॉलचे एक अधिकृत परवाना देण्यात आला आहे. या लायसन साठी अनेक वर्षापासून वर्तमान वितरण क्षेत्रात काम करणारे अनुभवी वसंतराव मोरे यांनी अर्ज केला होता. त्या अनुषंगाने त्यांना नुकताच पेपर स्टॉलचा परवाना देण्यात आला आहे.या स्टॉलचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार भावसार यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी स्टॉलचे मालक वसंतराव वाघमारे, मा. उपनगराध्यक्ष जे.के कुरेशी, माजी सरपंच राजेश मोरे , वृत्तपत्र वाचक कबिर तांबोळी हे उपस्थित होते. मंठा बस स्थानकात असलेले व्यावसायिक गाळे सदर गाळे व्यवसाय करण्याकरिता मिळावेत यासाठी व्यावसायिक संभ्रमात आहेत. त्यांना या गाळ्याबाबत योग्य ती माहिती महामंडळाकडून मिळत नाही. त्यामुळे महामंडळाने याबाबत योग्य जनजागृती करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे. नवीन बस स्थानकात वाघमारे यांना परिवहन मंडळाकडून पेपर स्टॉलसाठी अधिकृत गाळा देण्यात आला. तसेच इतर व्यवसायिकांनाही नियम व अटी शर्ती अधीन राहून मागणीप्रमाणे गाळे देण्यात यावे याचबरोबर याची माहिती वृत्तपत्रात देखील कळवावी अशी नागरिकांची माफक अपेक्षा आहे.

### वरुड खुर्द येथे अवकाळी पावसाचे थैमान

#### शेतकऱ्याची सिंचन विहीर कोसळून मोठे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील वरुड खुर्द येथील शेतकऱ्याची एमआरजीएस मधून सुरु असलेली विहीरीचा अवकाळी पावसाने कठडा कोसळून मोठे नुकसान झाले आहे. वेळेत विहीर मंजूर झाली नसल्याने ऐन पावसाळ्यात काम सुरु झाल्याने शेतकऱ्याला यातून आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे.

वरुड खुर्द येथील शेतकरी रुख्मण सदाशिव गाढे यांच्या गट नंबर २५४ मध्ये विहिरीचे बांधकाम सुरू होते. जवळपास ५० फूट खोलीची विहीरीचे जवळपास २८ फूट झाले होते असे या विहिरीचे काम झालेले असतांना आलेल्या अवकाळी पावसामुळे



विहिरीचा कठडा ढासळल्याने ती संपूर्णपणे कोसळली. यात शेतकऱ्याचे जवळ जवळ चार ते पाच लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. याबाबत शेतकरी रुख्मण गाढे यांनी सांगितले की, संबंधित विभागाचा हलग्जीपणामुळे ''सिंचन विहिरीसाठी मंजुरी वेळेत मिळाली नाही म्हणून वेळेला काम सुरु होऊ न शकल्याने आज पावसामुळे हि परिस्थिती माझ्यावर ओढवली आहे. याला संबंधित प्रशासन जबाबदार असून मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्यामुळे संबंधित विभागान आणि जिल्ह्याचे पालकमंत्री याची त्वरित पाहणी करून मदतीची कार्यवाही करावी, शासनाने याची तातडीने दखल घेऊन नुकसान भरपाई द्यावी अशी शेतकऱ्याने मागणी केली.

## जिल्हाधिकारी कार्यालय व राजुरी स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हातील २३४ महाविद्यालयात राबविण्यात येणार

### ''मी बारावी पास मतदार नोंदणी करणार हमखास''

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी इयत्ता १२ वीची परिक्षा दिलेल्या ३५ हजार विद्यार्थांच्या मतदार यादीत नावनोंदणीसाठी 'मी बारावी पास... मतदार नोंदणी हमखास....! हा विशेष उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालय जालना व राजुरी स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील २३४ महाविद्यालयात राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व राजुरी स्टील जालनाचे व्यवस्थापकीय संचालक कैलास लोया यांनी संयुक्तपणे दिली. यावर्षी दि. ५ मे, २०२५ रोजी बारावी परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून, जिल्ह्यातील २३४ महाविद्यालयातील ३५ हजार ५१९ विद्यार्थांनी बारावीची परिक्षा दिलेली आहे. निकाल लागल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ही मुले देशाच्या विविध भागात जातात. बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे वय हे १८ वर्षे पूर्ण झालेले असते व हे विद्यार्थी मतदार यादीत नाव नोंदणीसाठी पात्र असतात हीच बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. १२ उतीर्ण झालेले विद्यार्थी महाविद्यालयात टी. सी. व गुणपत्रिका हस्तगत करण्यासाठी आल्यानंतर संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठीचा नमुना अर्ज क्रमांक ६ भरुन घेण्यात यावा. या अर्जासोबत आधार कार्ड, विद्यार्थ्याचे गुणपत्रक व टी.सी. सोबत जोडून सदरील अर्ज तहसील कार्यालयात निवडणूक विभागात दि. १० जून, २०२५ पर्यंत सादर करावेत.




| तालुक्याचे नाव | महाविद्यालय संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| जालना | ४५ | ६६१० |
| बदनापुर | ३० | ३३११ |
| अंबड | २३ | ५११ |
| घनसावंगी | १६ | १४५४ |
| परतुर | १३ | २६९४ |
| मंठा | १३ | २०२९ |
| भोकरदन | ६७ | १२६४३ |
| जाफ्राबाद | २७ | ३१६७ |
| एकूण | २३४ | ३५५१९ |

याबाबत जिल्ह्यातील २३४ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची तालुकानिहाय तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरावर बैठक घेण्यात येणार असून, याठिकाणी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना बॅनर, स्टिकर्स व नमुना अर्ज क्रमांक ६ अर्जांचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमात जे महाविद्यालय १०० टक्के विद्यार्थ्यांची मतदार यादीत नाव नोंदणी करेल अशा महाविद्यालयांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील २३४ महाविद्यालयातील प्राचार्यांनी व विद्यार्थांनी या उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व राजुरी स्टील जालनाचे व्यवस्थापकीय संचालक कैलास लोया यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## आ . संतोष दानवे यांच्या माध्यमातून जाफ्राबाद आगार होणार अद्यावत

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद /प्रतिनिधी**



आजच्या आधुनिक काळात दळणवळणाची साधने अतिशय महत्त्वाची आहे यामध्ये प्रामुख्याने भूमिका येते ती म्हणजे गोरगरीब सर्वसामान्य व वयोवृद्ध यांच्याकरीता लाईफ लाईन समजली जाणारी लाल परी म्हणजेच एसटी बस! बऱ्याच दिवसापासून माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व आमदार संतोष दानवे यांच्याकडे जाफ्राबादकरांची मागणी होती की आपण या भागाचे लोकप्रतिनिधी म्हणून मतदार संघामध्ये भरपूर विकास कामे केली आहे आणि करत असतात परंतु तेव्हढे जाफ्राबाद आगाराचा सुद्धा विकास करावा आणि प्रवाशांना सर्व सुख सोयी-सुविधा युक्त आगार, बस स्थानक, बसेस मिळाव्या अशी माफक अपेक्षा व्यक्त केली. त्याच पार्श्वभूमीवर माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन जाफ्राबाद आगाराच्या विकास कामा संदर्भात चर्चा करून अखेर निधी मंजूर करून घेतला. आणि नंतर आमदार संतोष दानवे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून घेतला. आणि जाफ्राबाद तालुक्यातील नागरिकांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा असलेला विषय मार्गी लागला आणि आज नवीन बस स्थानक बांधकामाचे काम लवकरात लवकर सुरू होणार आहे. आमदार संतोष दानवे यांच्या माध्यमातून तालुक्यातील जवळपास ९० टक्के रस्त्याचे डांबरीकरणासह सिमेंट कॉंक्रिटीकरण करून रस्त्याची जाळे निर्माण केले आहे त्यामुळे प्रवास अजूनही सोपा झाला आहे. सध्यपरीस्थितीमध्ये जाफ्राबाद आगारात एकूण ६१ बस सुरू आहे त्या मार्फत जवळपास ३५० ते ३७५ फेऱ्या पूर्ण व्हायच्या परंतु आता आमदार संतोष दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने आगारामध्ये मानव विकास मिशन अंतर्गत शाळकरी मुलींसाठी नवीन ०८ बस त्याचबरोबर नवीन अद्यावत १० लालपरी आणि लवकरच २५ इलेक्ट्रिक बस जाफ्राबाद आगारामध्ये दाखल होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आगारामध्ये चार्जिंग स्टेशनचे सुद्धा काम सुरू आहे. या सर्व बसेसच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना सर्व सुख सोयी-सुविधा युक्त बस मधून प्रवास सुखकर होणार असून त्याबद्दल तालुक्यातील नागरिकांनी आणि वयोवृद्ध प्रवाशांनी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे व आमदार संतोष दानवे यांचे अभिनंदन करून आभार मानले आहे.

## तालुका अरोग्य अधिकारी कार्यालयात जागतीक मासीक पाळी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**

मंठा येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मंठा व ग्रामीण रुग्णालय मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मासिक पाळी दिन साजरा करण्यात आला दर वर्षी २८ मे हा जागतिक मासिक पाळी दिन महणून साजरा केला जातो ..त्या नुसार आज प्राथमिक आरोग्य केंद्र ढोकसाळ व ग्रामीण रुग्णालय मंठा येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी स्त्री रोग तज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ वैशाली देशमुख यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की मासिक पाळी नैसर्गिक प्रक्रिया असुन यामध्ये प्रत्येक महीला व मुलीने आपल्या मासिक पाळी चे दरम्यान वैयक्तिक पातळीवर स्वछता राखली पाहिजे योग्य



प्रमाणात आहार घेणे योगा करणे सॅनिटर पॅाड चा वापर करणे पुरेसा आराम करणे आवश्यक आहे त्या सर्व महीला व मुलींनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी अशी माहिती दिली ..यावेळी प्रमुख पाहुणे महणून तालुका आरोग्य अधिकारी डॉ जगन्नाथ कुंडकर आरोग्य सहाय्यक सुजीत वाघमारे विलास देशमुख अशोक आढे अमर झोल समुउपेशक राम काळे अधिपरिचारीका श्रद्धा हजबे दिपाली कल्याणकर चंद्रकला पोपटे बबीता केसकर ज्योती घेणे यांच्या सह आशा स्वयंसेविका हजर होते.

## पशुसंवर्धन मंत्र्यांच्या उपस्थितीत गौशाळा संचालकांचा मेळावा घेणार : जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

गाईंचे पालन-पोषण, संवर्धनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने कल्याणकारी योजना राबविल्या असून गौपालकांच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंढे यांच्या उपस्थितीत गौशाळा संचालकांचा मेळावा घेणार असल्याची माहिती भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी दिली. श्री गोरक्षण पांजरापोळ गोशाळेत गौशाळा महासंघाचे संयोजक डॉ.सुनील सुर्यवंशी यांच्या हस्ते भास्करराव पाटील दानवे यांचा सत्कार करण्यात आला.अध्यक्षस्थानी पांजरापोळ गोशाळेचे अध्यक्ष घनश्यामदास गोयल हे होते. पांजरापोळ गोशाळेचे सचिव कैलास बियाणी, कोषाध्यक्ष विजय कामड, विश्वस्त महेंद्र भक्कड,विजय राठी, संजय लाहोटी, यांची प्रमुख उपस्थिती होती. भास्करराव पाटील दानवे यांनी जालन्यात उद्योजक, व्यापारी बांधवांकडून सेवा भावनेने गाईंची सेवा केली जाते असे नमूद करत पांजरापोळ गोशाळेस आपले सहकार्य राहील अशी हमी दानवे यांनी दिली. घनश्यामदास गोयल यांनी अध्यक्षीय समारोप केला. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष विजय कामड यांनी केले. कार्यशाळेत विलास तांगडे, उद्धव घुमरे, बन्सीधर आटोळे, गंगाधर सुरवसे, हरिश्चंद्र सूकोसे,गजानन घोडके, विवेक गाढे, विश्वनाथ घोडके, विष्णूकुमार चेचाणी, विजय बोडले, श्रीराम राठोड, भागवत डोंगरे, किसन बरडे, विष्णू आनंदे, भगवान उगले, भरत भांदरगे, रवींद्र मदने, आरगडे यांच्या सह गौशाळा संचालकांची उपस्थिती होती.



## बदनापूर तालुक्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ आणि आमदार कुचे यांनी केली पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/ प्रतिनिधी**

: बदनापूर तालूक्यातील रोषणगाव महसूल मंडळात काल झालेल्या अतिवृष्टीने नुकसान झालेल्या भागाची आज जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि बदनापूर-अंबड विधानसभेचे आमदार नारायण कुचे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी तालुका कृषि अधिकारी श्री. गोपाल गुजर, प्र. तहसिलदार श्री. तायडे आदींची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि बदनापूर-अंबड विधानसभेचे आमदार नारायण कुचे यांनी मौजे. बाजार वाहेगाव येथील शेतकरी नवनाथ भिमराव लांडगे यांच्या शेतातील अतिवृष्टीने ढासळलेल्या विहीरीची पाहणी केली. तसेच बाजार वाहेगावातील नदीला आलेल्या पुरामुळे झालेल्या नुकसानीची देखील पाहणी केली. तसेच मौजे वाकुळणी येथील शेतकरी गणेश सुदामराव कोळकर यांच्या नुकसानग्रस्त डाळींब बागेची पाहणी केली. तसेच कडोळी येथील नाल्याची देखील पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी तहसिलदार बदनापूर आणि तालुका कृषि अधिकारी बदनापूर यांना वस्तुनिष्ठ पंचनामे करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच आमदार नारायण कुचे यांनी अतिवृष्टीने बाधित सर्व शेतकऱ्यांना जास्तीत-जास्त मदत शासनाकडुन उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले. तसेच अतिवृष्टीमुळे खचलेल्या विहिरासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून तरतुद करण्याचे आश्वासन यावेळी दिले. यावेळी महसुल आणि कृषि विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## लहुजीनगर भागामध्ये नागरी सुविधा व रस्त्यासह गटाराची कामे करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**प्रतिनिधी / बदनापूर**

बदनापूर शहरातील वॉर्ड क्रमांक तीनमधील लहुजीनगर भागात विकासकामे न झाल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. तत्काळ मुख्य रस्ता व भूमिगत गटाराची कामे करण्यात यावी, अशी मागणी समाजसेविका मंजू त्रिभुवन व या भागातील महिलांनी नगर पंचायत मुख्य अधिकाऱ्यांना निवेदन देऊन केली आहे. बदनापूर (शिवप्रसाद दाड)बदनापूर शहरात नगर पंचायत अस्तित्वात आल्यानंतर कोट्यवर्षीचा निधी प्राप्त झाला. आमदार नारायण कुचे यांनी शहराच्या विकासासाठी निधी खेचून आणला. मात्र, नगर पंचायत पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे नियोजन नसल्यामुळे शहरातील अनेक भागात सिमेंट रस्ते, गटार नाल्या झालेल्या नाहीत. त्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. नगरसेवक जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. या भागात जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे व गटार नाल्याचे काम न झाल्याने अवकाळी पडलेल्या पावसामुळे या भागातील नागरिकांना घराबाहेर निघणे मुश्किल झाले आहे. घरातून निघताना चिखल तुडवीत जावे लागते. दुचाकी वाहने जाण्यासाठी रस्ताच नसल्याने घरापर्यंत चिखल तुडवीत पायी जावे लागत आहे. या भागातील नागरिकांनी अनेकदा नगरपंचायतीकडे तक्रारी केल्या. मात्र दखल घेण्यात आली नाही. या परिसरात तत्काळ मुख्य रस्ता व भूमिगत गटार नाल्याचे काम करावे, अशी मागणी निवेदनाद्वरे करण्यात आली आहे. निवेदनावर छाया त्रिभुवन, पद्मा पवार, मथुरा करताडे, लक्ष्मी कदम, संगीता दाभाडे, वैशाली उगले, वच्छलबाई मगरे आदींची नावे आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २९ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ५७ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बिडकीन येथे हजरत निजामोद्दीन औलीया ची छबिना मिरवणूक उत्साहात संपन्न

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ में पैठण तालुक्यातील बिडकीन येथे दि.२५ मे रविवार रोजी हकीम मोहल्ला इनामदार गल्ली तेथुन छबिना मिरवणूकीला सुरुवात करण्यात आली.ईनामदार यांच्या आज़ोबा पंजोबा पासून संदल,छबिना ही परंपरा आजपर्यंत कायम आहे

तसेच हि दर्गा जुनी काळातील ऐतिहासिक औरंगाबाद पैठण रोडवर आहे.हजरत निजामोद्दीन औलीया दर्गा चा छबिना पांढरा घोड्याला सजवुन गलेप व फुलाची चांदर टाकुन सुरवात बॅन्ड पथकाने झाली.या मिरवणूक प्रसंगी शब्बीर इनामदार, संपादक अली इनामदार,आजम इनामदार, सद्दाम इनामदार, बशीर इनामदार,जियाऊद्दीन इनामदार,शेकरहीम इनामदार,अमिनोद्दीन इनामदार, कबीर इनामदार,नसिर इनामदार,जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण,ग्रा प.सदस्य अविनाश राठोड, मा.पंचायत समिती सदस्य नन्हेंखा पठाण, लतीफ कुरैशी,आमेल इनामदार,आजम शेख, फेरोज, शेख,मिनाज रहीम इनामदार, विकास गोर्डे,काकासाहेब टेके,अजय राठोड, प्रविण चव्हाण,मोसिन शेख, किशोर अवचिंदे, फय्याज पठाण,असलम सैय्यद, सय्यद सद्दाम,महेमुद शहा, सलमान पठाण, किशोर धर्मे, मुख्तार सय्यद, इम्रान इनामदार,अरबाज पठाण अशपाक इनामदार, सय्यद फेरोज,समिर पठाण, पत्रकार अरुण देविदास,हासन चाऊस, रविंद्र गायकवाड, गणेश सोनवणे,फेरोज मिर्झा,अलीम शेख, इलियास शेख तसेच सर्व समाज बांधव सर्व पक्षातील पदाधिकारी बिडकीन व परिसरातील पंचक्रोशीतील नागरिक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.तसेच बिडकीन पत्रकार संघावतीने दर्गावर चादर टाकण्यात आली.या मिरवणुकीत पाटोदा येथील जनता ब्रास बैंड,व शंकरपुर येथील उस्मान शहा ब्रास बॅन्ड या दोन पथकाची चांगलीच जुगलबंदी चालु होती .ही छबिना मिरवणुक व बॅण्डपथकाची जुगल बंदी पाहण्यासाठी बिडकीन व परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या बॅण्ड पथकाच्या जुगल बंदी मुळे बिडकीन शहर दुमदुमुन गेले होते.या मिरवणुकीत सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दंगा नियंत्रण काबु पोलीस,व बिडकीन पोलीसांचा मोठा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## अहमदनगरच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली

अहमदनगर: जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत अहमदनगरमधील तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला आहे. सावित्रीबाई फुले इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिंदे शरण्या भागवतने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये प्रथम क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र जिंकले. त्याचप्रमाणे, सेंट मायकल स्कूलचा विद्यार्थी मिवान कास्वानेही आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरे स्थान पटकावले आणि आंतरराष्ट्रीय रौप्य पदकासह प्रमाणपत्र जिंकले. ऑप्युलेन्स स्कूल ऑफ एज्युकेशनच्या अझैन फिरोज तांबोळीने आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय कांस्य पदक आणि प्रमाणपत्र जिंकले.

## फ़िनेस्टाची राज्यात पुढची वाटचाल, नव्या शोरूमचे उद्घाटन

नाशिक, २३ मे २०२५: फ़िनेस्टा,भारतातील खिडक्या आणि दरवाजे बनविणारा सर्वात विश्वसनीय ब्रॅन्ड असून, आपली महाराष्ट्रावर घट्ट पकड बसविण्याकरिता आता नाशिकमध्ये आपली शोरूम सुरू करित आहे. आरके ल्युमिनरीद्वारा कार्यरत केली जाणारी ही शोरूम, ठक्कर एम स्क्वेअर, २ रा मजला, आकाशवाणी टॉवर जवळ, पुर्णवड नगर नाशिक- ४२२००५ येथे असणार आहे, येथे स्थानिक मागणीनुसार उच्च गुणवत्ता असलेल्या एमएमआर झोन (मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन) मधील फ़ेन्स्ट्रेशन उपाय योजना प्रदान केल्या जातील. या नव्या शोरूमची रचना ही ग्राहकांशी संवाद साधणारी आणि सखोल असा अनुभव देणारी केली गेली असून, यामुळे फ़िनेस्टाचा व्यापक अशा उत्पादनांची श्रेणी ग्राहकांना बघायला मिळेल ज्यामध्ये यूपीव्हीसी आणि ल्युमिनियमचा खिडक्या आणि दरवाजे, तसेच सॉलिड पॅनल डोअर आणि नवीन सादर केले जाणारे फ़ेसाड्स देखील असतील. आजचा आधुनिक रचनात्मकतांमध्ये फ़िनेस्टाची कल्पकतेप्रती, ऊर्जा परिणामकारकता आणि स्टायलिश डिझाईन करताची भारतीय घरांप्रती आणि वातावरणीय परिस्थितींप्रती असलेली बांधिलकी यातून दिसून येते.

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ - स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## प्रतिबंधात्मक आदेश

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ - आगामी कालावधीत कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१चे कलम ३७ (१) व ३७(३) अन्वये मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी संगिता राठोड यांनी हे आदेश निर्गमित केले असून दि.८ जून पर्यंत हे आदेश अंमलात राहतील,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# रशियन युद्धनौका 'तमाल' नौदलाच्या ताफ्यात येणार; गोव्यात आणखी २ बनवणार

पणजी/मुंबई : भारताची नवीनतम स्टेल्थ क्षेपणास्त्र फ्रिगेट 'तमाल' ही युद्धनौका आगामी जून महिन्याच्या अखेरीस रशियातील कालिनिनग्राड येथील यांतर शिपयार्ड येथे औपचारिकपणे भारतीय नौदलात समाविष्ट होणार आहे. संरक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली आहे. या बातमीने पाकिस्तानला मात्र चांगलीच धडकी भरली आहे.

यासंदर्भातील अधिकृत माहितीनुसार तमाल युद्धनौका सप्टेंबरमध्ये भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर पोहोचेल आणि मुंबईतील वेस्टर्न फ्लीटचा भाग म्हणून सेवा बजावेल. 'तमाल' ही रशियाबरोबर करण्यात आलेल्या २.५ अब्ज डॉलर्सच्या करारातील ४ स्टेल्थ फ्रिगेट्सपैकी दुसरी नौका आहे. या करारांतर्गत २ नौका रशियातील यांतर शिपयार्डमध्ये तर उर्वरित २ नौका गोवा शिपयार्ड लिमिटेडमध्ये



तयार केल्या जात आहेत. यासाठी रशियाकडून तंत्रज्ञान हस्तांतरण देखील करण्यात येत आहे.

या करारातील पहिली नौका 'आयएनएस तुशील' गेल्या डिसेंबरमध्ये यांतर शिपयार्डमध्ये नौदलात समाविष्ट झाली होती आणि ती फेब्रुवारीत भारतात दाखल झाली होती. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत या युद्धनौकेचे स्वागत करण्यात आले होते. त्यांनी 'तुशील'चे वर्णन भारताच्या वाढत्या सागरी सामर्थ्याचे प्रतीक आणि भारत-रशिया मैत्रीचे दृढचिन्ह असे केले होते.

'तमाल' आणि 'तुशील' या दोन्ही घीर्ळीरंझ खखख वर्गातील सुधारित फ्रिगेट्स आहेत. या 'प्रोजेक्ट ११३५.६' अंतर्गत तयार करण्यात आल्या असून, आधीपासूनच ६ अशा फ्रिगेट्स भारतीय नौदलात कार्यरत आहेत. यातील ३ 'तलवार' वर्ग आणि ३ 'तेग' वर्ग फ्रिगेट्स आहेत. नवीन 'तमाल' फ्रिगेटमध्ये सुमारे २६ टक्के स्वदेशी तंत्रज्ञानाचा समावेश आहे. यापुर्वीच्या 'तेग' वर्ग फ्रिगेट्सच्या तुलनेत ही टक्केवारी दुप्पट आहे.

या फ्रिगेटसाठी भारतातील ३३ कंपन्यांनी योगदान दिले आहे. यात भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल), ब्रह्मोस एरोस्पेस (भारत-रशिया संयुक्त उपक्रम), आणि टाटा अॅडव्हान्स्ड सिस्टीम्सची उपकंपनी नोव्हा इंटिग्रेटेड सिस्टीम्स यांचा समावेश आहे.

तसेच युद्धनौकेवर आधुनिक शस्त्रास्त्रांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये ब्रह्मोस सुपरसोनिक क्रूझ क्षेपणास्त्र, सुधारित श्रेणीची 'श्तील' पृष्ठभाग-विरुद्ध-हवा क्षेपणास्त्रे, मध्यम श्रेणीतील तोफा, ऑप्टिकली नियंत्रित जवळच्या अंतरावर झपाट्याने गोळीबार करणारे तोफखाने, टॉरपीडोज आणि रॉकेट्स यांचा समावेश आहे. 'तमाल'च्या नौदलातील समावेशामुळे भारतीय महासागर क्षेत्रातील भारताची सागरी शक्ती अधिक भक्कम होणार आहे.

# ५ हजार ६00 शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान

### ५३८ हेक्टरवरील पिकेही बाधित

पालघर : पालघर जिल्ह्यात ६ व ७ मे रोजी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे फळबागांना चांगलाच फटका बसला आहे. ५ हजार ६०० शेतकऱ्यांच्या २ हजार १६३ हेक्टरवरील फळबागांचे नुकसान झाले असून, १ हजार ९२३ शेतकऱ्यांच्या ५३८ हेक्टरवरील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्तांना मदत मिळावी म्हणून पालकमंत्री गणेश नाईक यांनी मत्स्यव्यवसाय मंत्री. नितेश राणे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मदतीची मागणी केली आहे. जिल्ह्यात सहा व सात मे रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे २ हजारांहून अधिक घरांची पडझड झाली आहे. त्याचप्रमाणे धाकटी डहाणू येथील ९८ बोटींसह १०२ बोटीचे नुकसान झाले आहे.

वसई तालुक्यातील अर्नाळा गाव, अर्नाळा किल्ला, पाचूबंदर तसेच पालघर तालुक्यातील ३ गावांमधील सुक्या मासळीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या सुक्या मासळीचे नुकसान झाले आहे.घरांचे, शेती पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाल्यामुळे सर्वे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिले होते. नुकसानीचा सर्वे पूर्ण झाला असून वादळी वारा व पावसाचा फटका सर्वाधिक फळबागांना बसला आहे. २ हजार १६३ हेक्टर वरील फळबागांचे नुकसान वादळी वारा व पावसामुळे झाले आहे.

तसेच शेती पिकांसह घरांची सुद्धा मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना, मच्छीमार बांधवांना शासकीय मदत त्वरित मिळावी म्हणून, पालकमंत्री गणेश नाईक यांनी मत्स्य व्यवसाय मंत्री नितेश राणे ,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २१ कोटींच्या निधीची मागणी केली आहे.

## कल्याण डोंबिवलीत आणखीन एक कोरोनाचा बळी

ठाणे: देशभरात दिवसागणिक कोरोनाचे रुग्ण वाढत चालले असून, महाराष्ट्रातही कोरोनाने हातपाय पसरवायला सुरुवात केली आहे. दरम्यान ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत (केडीएमसी) आणखीन एका रुग्णाचा कोविड-१९ ने मृत्यू झाला आहे.

कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून, या ठिकाणी आणखीन एका कोरोना रुग्णाचा मृत्यू झाला आहे. यापूर्वी ४७ वर्षीय महिलेचा कोरोनाने मृत्यू झाल्याची नोंद होती. त्यानंतर आता ५७ वर्षीय पुरुषाचा कोरोना विषाणूने बळी घेतला आहे.

या व्यक्तीवर कळवा रुग्णालयामध्ये गेल्या सहा दिवसांपासून उपचार सुरू होते. केडीएमसीमध्ये सध्या दोन कोरोना रुग्णांवर खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. कोरोनाने कल्याण-डोंबिवलीमधील नागरिकांची चिंता वाढवली आहे.

# सरळ सेवा भरतीतील सहायक अभियंत्यांची यादी होणार जाहीर

मुंबई : महावितरणकडून सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे अभियांत्रिकी पदवीधारक (वितरण/स्थापत्य) ३४२ उमेदवारांची सहायक अभियंता पदासाठीची निवड यादी जाहीर करण्यात आली होती. या निवड यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी दरम्यान अपात्र व गैरहजर तसेच नियुक्तीपत्रातील विहीत मुदतीमध्ये रुजू न झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणात महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार प्रतीक्षा यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

महावितरणच्या ु.ारहरवळीलो.ळप या अधिकृत संकेतस्थळावर प्रतीक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल. महावितरणच्या जाहिरात क्र. ०७/२०२३ अन्वये अभियांत्रिकी पदवीधारक (वितरण-३०२ व स्थापत्य-४०) सहायक अभियंता पदाच्या ३४२ जागांसाठी सरळ सेवा भरती प्रक्रिया राबविली आहे. त्याप्रमाणे दि. १४ जानेवारी २०२५ रोजी सहायकअभियंता पदासाठी निवड यादी जाहीर करण्यात आली.

कनिष्ठ अभियंतापदी ९१ उमेदवारांना नियुक्तिपत्र

कनिष्ठ अभियंतापदी अभियांत्रिकी पदविकाधारक ९१ उमेदवारांची निवड प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार सरळ सेवा भरतीद्वारे ७२ तर अनुकंपा तत्त्वानुसार १९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. अर्जासोबत या उमेदवारांना परिमंडलस्तरावर नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील सहा मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

दिल्ली : विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणा-या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां' ने आज सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती यांच्या हस्ते आज दुस-या व अंतिम टप्प्यात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनकड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण व केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ .मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' (मरणोत्तर) तर अशोक सराफ, अच्युत पालव , अश्विनी भिडे-देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी तसेच कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा व वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्काराने राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# गंगापूर कायगाव रस्त्याच्या कामास सुरुवात

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२८: मराठवाड्याला पश्चिम महाराष्ट्राशी जोडण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या गंगापूर ते कायगाव रस्त्याच्या दुरुस्तीला अखेर मुहूर्त लागला असून आज महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ठेकेदारामार्फत या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे वाल्मीक शिरसाठ यांच्या प्रयत्नाला अखेर यानिमित्ताने यश आले आहे.

गंगापूर शहर आणि परिसराच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. कायगाव येथे होणाऱ्या धार्मिक विधीसाठी या रस्त्याने दररोज हजारो नागरिकांची ये जा होत असते.चार-पाच वर्षांपूर्वी या रस्त्याच्या कामावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने जवळपास ५७ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते मात्र हा रस्ता पूर्ण होण्याच्या आधीच पूर्णतः उखडून गेला होता. गंगापूरहून अहिल्यानगर पुण्याकडे जाणाऱ्या नागरिकांना भेंडाळा फाटा मार्गे डबल लांबीचा प्रवास करावा लागत होता त्यातच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने हा रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास



महामंडळाकडे वर्ग करण्यात आला होता त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती कोणी करायची यावरून दोन्ही विभागांमध्ये गेली अनेक महिन्यांपासून तू तु मी मी होऊन रस्त्याचे काम रेंगाळत पडलेले होते. रस्त्यावर खड्डे वाढत असल्याने अपघाताचे प्रमाण देखील वाढत होते. याबाबत श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष वाल्मीक शिरसाठ यांनी काही दिवसांपूर्वी या रस्त्यावर सामान्य नागरिकांना सोबत घेऊन थेट जनआंदोलन करण्याचा इशारा दिला होता तसेच याबाबत रस्ते विकास महामंडळाकडे मागील एक महिन्यापासून सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. या पाठपुराव्याची महामंडळाने दखल घेत कार्यकारी अभियंता सुनील ठाकरे यांच्यासह काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रस्त्याची नुकतीच पाहणी करून संबंधित ठेकेदाराला या रस्त्याची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले होते.त्यानुसार आज पासून या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून पुढील चार-पाच दिवसांमध्ये हा रस्ता नागरिकांना जाण्यायोग्य होईल.या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात खड्डे भरण्यात येणार आहे व पावसाळ्यानंतर हॅम प्रकल्प अंतर्गत देवगाव ते टोका या संपूर्ण रस्त्याचे रुंदीकरण होऊन नव्याने सिमेंट रस्ता तयार करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## एमजीएममध्ये माजी विद्यार्थी संवाद सत्र उत्साहात संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयातील (जेएनईसी) संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभाग आणि इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने माजी विद्यार्थी संवाद सत्राचे आयोजन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या परिषद सभागृहात करण्यात आले होते. या संवाद सत्रात देशविदेशातील नामवंत माजी विद्यार्थी, विभागप्रमुख व प्राध्यापक यांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग घेतला. इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी संचालिका डॉ.शर्वरी तामणे यांनी संवाद सत्राचे प्रास्ताविक करताना विद्यापीठाची अभ्यासक्रम रचना, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि पाठीमागील ३ दशकांतील एमजीएम संस्थेचा आणि महाविद्यालयाचा झालेला विकास याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी झालेल्या संवाद सत्रात माजी विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रातील सद्य ट्रेंड्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या समावेशाबाबत महत्त्वपूर्ण माहिती देत विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात काम करताना कोणते कौशल्य असणे आवश्यक आहे, याबद्दल सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे उद्योग क्षेत्र आणि महाविद्यालय एकत्रित येत काय करता येऊ शकेल, यावर विचारमंथन केले. संवाद सत्र समाप्तीनंतर माजी विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांची भेट घेत शैक्षणिक विषयावर चर्चा करताना उद्योग आणि एमजीएम विद्यापीठ यातील सहकार्याविषयी चर्चा केली. या संवाद सत्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यात एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी संचालिका डॉ.शर्वरी तामणे, इन्फिनियम यूके लि.इंग्लंड येथे कार्यरत असलेल्या डेटा सायंटिस्ट डॉ. स्वाती जाधव आदींचा समावेश होता.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर करा - राधाकृष्ण विखे पाटील

### अतिवृष्टी नुकसानीची पालकमंत्र्यांकडून पाहणी; आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे

अहिल्यानगर, दि.२८- अतिवृष्टीमुळे अहिल्यानगर तालुक्यातील तीन मंडळाच्या ४५ गावांमध्ये शेतपीक, फळपीक, बंधारे, रस्ते, घरे, पुलांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पशुधनाचीही हानी झाली आहे. आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानीच्या मदतीपासून एकही नागरिक वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. झालेल्या नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

अहिल्यानगर तालुक्यातील अकोळनेर, खडकी व वाळकी या गावात झालेल्या नुकसानीची राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज पाहणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत उपस्थित शेतकरी व नागरिकांशी संवाद साधत झालेल्या नुकसानीची माहिती घेतली.

यावेळी आमदार शिवाजी कर्डीले, आमदार काशिनाथ दाते, माजी आमदार बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, तहसीलदार संजय शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सागर चौधरी, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सुनील तुंभारे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी अकोळनेर गावातील वालुंबा नदी परिसरात झालेल्या नुकसानीची पाहणी करत झालेल्या नुकसानीची ग्रामस्थांकडून माहिती घेतली.

खडकी गावामध्ये ऋषिकेश निकम यांच्या शेतामधील मोसंबीसह इतर पिकाची, शंकूतला तात्याराम कोठुळे यांच्या नुकसान झालेल्या शेतीची पाहणी करून त्यांच्याशी संवाद साधत झालेल्या नुकसानीची माहिती जाणून घेतली. तसेच पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या

सयाजी कोठुळे यांच्या कुटुंबातील सदस्यांसमवेत संवाद साधून कुटुंबीयांना धीर देत घाबरू नका, शासन तुमच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाहीही पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी दिली.

वाळकी येथे गावठाणातील पूल परिसरातील तसेच जुंदरे मळा परीसरातील नुकसानीची पाहणी करून ग्रामस्थांकडून झालेल्या नुकसानीची माहितीही त्यांनी घेतली.

वाळकी येथे घेतला आढावा

नुकसानीच्या पाहणीनंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाळकी येथे अधिकाऱ्यांकडून आढावा घेतांना म्हणाले, मागील ५० ते ६० वर्षानंतर एकाच दिवसात १०० मिलिमीटर पेक्षा अधिक पाऊस झाल्याने नागरिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या काळात नागरिकांना आधार देण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त गावातील पंचनामे तातडीने होण्यासाठी जिल्ह्याच्या इतर तालुक्यातील मनुष्यबळ याकामी उपयोगात आणावे. ज्या गावामध्ये पावसाच्या पाण्यामुळे रस्ते खराब झाले असतील त्या रस्त्यांची तसेच बंधाऱ्यांची तातडीने दुरुस्ती करावी. गावांतील विद्युत प्रवाह सुरळीत होणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या ठिकाणी रोहित्र बदलण्याची आवश्यकता असेल त्याठिकाणी ती तातडीने बदलून विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी विद्युत विभागाने तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी दिल्या.

## उद्योजक यांनी कंपनी मध्ये कामगार घेताना ओळखीचा पुरावे घेतल्या शिवाय कामवार घेऊन नये- पो.अ. विनयकुमार राठोड

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २८ बिडकीन परिसरातील दिल्ली मुंबई इंडस्ट्रीज कॅरिडॉर मध्ये उद्योग वाढत असुन बिडकीन शहराची देखील व्याप्ती वाढत आहे येथे उद्योजकांना येणाऱ्या अडचणी व पोलिसांची भूमिका या उद्देशाने चोरी, दरोडा,सायबर हल्ले यांसारख्या गुन्हेगारी घटनावर आळा घालण्यासाठी आज २७ में रोजी छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ . विनयकुमार राठोड यांच्या संकल्पनेतून बिडकीन येथे उद्योजक व पोलीस प्रशासनाचा परिसंवाद घेण्यात आला.या परिसंवादात उद्योजकांच्या अडचणी जाणून घेतल्यानंतर औद्योगिक कारखान्यांचा आवाका पाहता क्लोज सर्किट कॅमेरे , खाजगी सुरक्षा यंत्रणा यांच्या मदतीने सजग राहून तसेच काही अनुचित घटना घडली तर ताबडतोब पोलिसांना



कळवले पाहीजे. नवीन कामगार कामावर घेताना आधार कार्ड, फोन नंबर असे ओळख पुरावे घेतल्या शिवाय कामावर ठेवू नये. औद्योगिकीकरण हा या राज्याचा कणा असुन पोलिस आणि उद्योजकामध्ये समन्वय असायला पाहिजे तरच वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सोपे जाईल . अशा सुचना उपस्थितांना देण्यात आल्या तसेच पोलिस सदैव आपल्या बरोबर राहील याची ग्वाही पोलिस अधीक्षक विनयकुमार राठोड यांनी उपस्थित उद्योजक व त्यांच्या प्रतिनिधींना दिली .यावेळी ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ.विनयकमार राठोड, पोलिस उप अधीक्षक पुजा नागरे , डि.एम.आय.सी. प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे, महेश शिंदे , स सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश शेळके, पोलिस उपनिरीक्षक महेश घुगे, संजिवन कदम, विष्णू गायकवाड, सोमनाथ तांगडे, संजय चव्हाण,यांच्या सह उद्योजक , व्यावसायिक व प्रतिनिधी पत्रकार ,उपस्थित होते. दरम्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश छबीलवाड यांनी केले तर प्रस्तावना सपोनि निलेश शेळके यांनी केले तसेच पोउनि.महेश घुगे यांनी उपस्थितांचे आभार मानले .

## अग्रलेख...

# चीनच्या नकाराधिकाराचा अन्वयार्थ

पुलवामा हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबा आणि त्याचे खतरनाक पिल्लू-दि रजिस्टन्स फ्रंट (टीआरआफ) तसेच जैश-ए-मोहम्मद यांच्यासह पाच संघटनांना 'जागतिक दहशतवादी' घोषित करावे, हा भारताचा प्रस्ताव रोखण्यासाठी चीनने संयुक्त राष्ट्रांच्या (युनायटेड नेशन्स-यूएन) सुरक्षा परिषदेत नकाराधिकाराचा (व्हेटो) वापर केल्याचे वृत्त हा केवळ तात्कालिक चिंतेचा विषय नाही; तो एकूण जगाच्या भविष्याबद्दल चिंता निर्माण करणारा आणि यूएनच्या रचनेतील गंभीर दोष दाखविणारा मुद्दा आहे. भारतासारख्या खंडप्राय देशाने आपल्या रक्षणार्थ जागतिक व्यासपीठावर मांडलेले सत्य नाकारण्यासाठी केवळ असूयेपोटी 'व्हेटो' वापरला जात असेल तर यूएन हे पाच स्थायी सदस्यांच्या हातचे बाहुले बनले आहे, असाच निष्कर्ष काढावा लागतो. यूएनने गतकाळात बरीच चांगली कामे केली असली, तरी ही जागतिक संघटना आजही फक्त पाच देशांच्या नियंत्रणात आहे आणि त्यात चीन आहे. सुरक्षा परिषद ही यूएनची सर्वोच्च यंत्रणा. तीत अमेरिका, ब्रिटन, रशिया, फ्रान्स आणि चीन असे फक्त पाच स्थायी सदस्य. म्हणायला जगातील जवळजवळ सर्व प्रमुख राष्ट्रे यूएनचे सदस्य. पण, सुरक्षा परिषदेतील एकाही स्थायी सदस्य राष्ट्राने नकाराधिकाराचा वापर केला तर कोणत्याही मुद्यावरील कोणताही प्रस्ताव रोखला जाऊ शकतो. चीनने भारताच्या प्रस्तावाच्या संदर्भात तेच केले. याची पुनरावृत्ती होता कामा नये.

यूएनमध्ये असे का घडते, हे समजून घेण्यासाठी थोडे मागे जावे लागते. पहिल्या महायुद्धाचा जगावर सामाजिक, आर्थिक, राजकीय परिणाम झाला. लाखो जीव गेले. मानसिक आजार बळावले. जगात युद्धविरोधी मानसिकता जन्माला आली. भविष्यातील युद्धे व संघर्ष रोखण्यासाठी जागतिक स्तरावर लीग ऑफ नेशन्ससारखी यंत्रणा असावी, असा विचार झाला आणि तो प्रत्यक्षातही आला. तरीही फार चांगले घडले नाही. लीग हा जागतिक पातळीवर राष्ट्रांच्या परस्पर सहकार्याचा पहिला औपचारिक प्रयोग होता. मात्र, तिला दुसरे महायुद्ध रोखण्यात यश आले नाही. पुढे लीगमधूनच संयुक्त यूएनचे स्वरूप आकाराला आले. मात्र, त्यावरदेखील लीगच्या धर्तीवर महासत्तांचेच आधिपत्य कायम राहिले. छोटे-मोठे संघर्ष घडले, पण महायुद्ध म्हणावे, असे काही यूएन अस्तित्वात आल्यानंतर घडले नाही हे खरे. मात्र, या संघर्षांमध्ये यूएनला प्रभावी हस्तक्षेप करणे जमले नाही. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि पूर्वाश्रमीचे सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांनी, ते दोघेही यूएनमध्ये सर्वसत्ताधीश असलेल्या सुरक्षा परिषदेचे सदस्य असताना जगात ठिकठिकाणी कुरघोड्या आणि अप्रत्यक्ष युद्धखोरी केलीच. यूएन बघत राहिली. सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य असलेले पाच देश हे यूएनचे म्होरके. त्यांच्यात आर्थिक, भौगोलिक वर्चस्वाचे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर केल्या जात असलेल्या हस्तक्षेपांसाठीचे संघर्ष आहेत आणि त्यामुळे सुरक्षा परिषदेचे सदस्य असूनही त्यांच्याकडून जागतिक समुदायाच्या शांततेचा विचार होत नाही. त्यामुळे भारताच्या प्रस्तावाचा विचार झाला नाही, हे तसे अपेक्षितच म्हटले पाहिजे. पुलवामामध्ये ज्या दहशतवादी संघटनेने हल्ला केला आणि ज्या संघटना भारताविरुद्ध सातत्याने कारवाया करीत आहेत, त्यांच्या संबंधीचा प्रस्ताव मान्य झाला असता तर जगाचे भलेच झाले असते. पण, भारताचे भले चीनला कधीही पाहवत नाही. यासंदर्भात संयुक्त राष्ट्रांचे विद्यमान प्रशासकीय प्रमुख म्हणजे महासचिव अँटोनियो गुटारेस यांनी एकदा काय म्हटले होते ते लक्षात घेतले पाहिजे. ते म्हणाले होते की, ''सुरक्षा परिषद सध्याच्या जगाशी सुसंगत नाही. सदस्य राष्ट्रांना मी सतत परिषदेच्या विस्तारावर चर्चा करण्यासाठी विनंती करीत असतो. या विषयाची चर्चा महासभेत (जनरल असेंब्ली) व्हावी, अशी माझी इच्छा आहे. पण, परिषदेचे स्थायी सदस्य या गोष्टीसाठी सहमत होत नाहीत...'' याची कारणे सुरक्षा परिषदेच्या पाच राष्ट्रांना असलेल्या नकाराधिकारात दडलेली आहेत, हे त्यांनी म्हटले नाही. पण, वास्तव तेच आहे. सुरक्षा परिषदेच्या रचनेतच प्रादेशिक असंतुलन आहे. आशियासारख्या सर्वांत मोठ्या खंडातून फक्त चीन स्थायी सदस्य. युरोप आणि आशिया खंडाला जोडलेला रशिया स्थायी सदस्य. आकाराने दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या आफ्रिका खंडातून कोणत्याही देशाला सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व नाही. तिसऱ्या क्रमांकाचा खंड उत्तर अमेरिका. त्यात फक्त युनायटेड स्टेट्स किंवा आपण अमेरिका म्हणून ओळखतो, तो एकमेव देश. चौथ्या क्रमांकावरील दक्षिण अमेरिका कुठेही नाही. फ्रान्स आणि युनायटेड किंगडम (ग्रेट ब्रिटन) ही युरोपातली दोन राष्ट्रे सुरक्षा परिषदेची स्थायी सदस्य आहेत. त्या दोघांची मिळून लोकसंख्या जेमतेम महाराष्ट्राएवढी असेल.

भारतासारखा जगातील सर्वांत मोठा लोकशाहीवादी देश सुरक्षा परिषदेत नाही. ऑस्ट्रेलिया खंडातील देश नाहीत. संयुक्त राष्ट्रांवर हुकूमत असलेल्या सुरक्षा परिषदेची रचना इतकी असंतुलित असेल तर तिच्याकडून न्यायाची अपेक्षा करणे चूक आहे, हे पुन्हा एकदा चीनच्या वर्तनावरून स्पष्ट झाले आहे. दुसऱ्या महायुद्धातील विजेत्या आणि त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्य बनलेल्या पी-५ (पी-फाईव्ह) राष्ट्रांचा गट आजही दादागिरी करतो. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, चीन आणि रशिया ही दुसऱ्या महायुद्धातील मित्र राष्ट्रे व जेती राष्ट्रे. या स्थायी सदस्यांपैकी एकानेही ठरवले तरी यूएनमधील कोणत्याही यंत्रणेचा कोणताही निर्णय रोखता येऊ शकतो. एकप्रकारे सुरक्षा परिषद ही जगावर सत्ता गाजवू पाहणाऱ्यांची परिषद आहे. आंतरराष्ट्रीय शांततेला बाधा आणणाऱ्या कोणत्याही घटनेचे विश्लेषण करणे व शांततेसाठी उपाय सुचवणे, ही सुरक्षा परिषदेची जबाबदारी असल्याचे यूएनची सनद (चार्टर) म्हणते. परिषदेच्या रचनेत कोणतीही सुधारणा करायची असेल तर यूएनच्या दोन तृतीयांश सदस्यांनी महासभेत सहमती दर्शविणे आवश्यक आहे. याशिवाय, नकाराधिकार असलेल्या पाचही स्थायी सुरक्षा परिषद सदस्यांची मंजुरीही आवश्यक आहे. ती कधीच मिळत नाही. भारताला सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व मिळावे, यासाठी अनेक देशांचा आग्रह आहे. २००५ मध्ये कोफी अन्नान यूएनचे महासचिव असताना त्यांनी सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या २४ वर नेण्याची योजना मांडली होती. त्या योजनेला बासनात बांधले गेले. स्थायी सदस्यांची संख्या ५ वरच कायम ठेवून अस्थायी सदस्यांची संख्या २० वर नेण्याची सूचना करण्यात आली. विषय भलतीकडेच गेला. महासचिव राहिलेले बान की मून हे देखील सुरक्षा परिषदेच्या विस्ताराच्या बाजूने होते.

गेल्या ५०-६० वर्षांत भारतातील लाखो जवानांनी शांतता मिशनवर काम केले. या पृष्ठभूमीवर विद्यमान पाच स्थायी सदस्यांपैकी चार (चीन वगळता) देशांनी भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या मुद्याला पाठिंबा दिलेला आहे. चीन स्पष्ट विरोध कधीही करीत नाही. पण, ते घडूही देत नाही. परिषदेच्या पुनर्रचनेचा मुद्दा फक्त भारतापुरता मर्यादित नाही. परिषदेचा विस्तार सर्व खंडांना प्रतिनिधित्व देण्यासाठी आणि विकसनशील आणि तिसऱ्या जगातील देशांचा विचार करण्यासाठी होण्याची गरज आहे. भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी, संयुक्त राष्ट्रांमध्ये 'डेमोक्रसी डेफिसिट' आहे अर्थात अपेक्षेएवढे लोकतंत्र नाही, असे मत मांडले होते. विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सुरक्षा परिषदेसह संयुक्त राष्ट्रसंघाच्या एकूणच पुनर्रचनेवर भर देणारे वक्तव्य महासभेच्या एका बैठकीत केले होते. आता पुन्हा एकवार सुरक्षा परिषदेच्या निर्णयांना महासभेने दोन तृतीयांश बहुमताने मंजुरी दिली पाहिजे आणि त्यात नकाराधिकाराचा विचार करू नये, अशी आग्रही मागणी लावून धरण्याची आवश्यकता आहे. महासभा आणि सुरक्षा परिषद यांच्यातील सध्याचे नाते सून आणि सासूचे आहे. सुरक्षा परिषद ही सासू आहे. ते उलटे होणे ही जगाची व काळाची गरज आहे. जगातील सर्व प्रकारचा दहशतवाद रोखण्यासाठीही ते आवश्यक आहे.

## विशेष

# भारताच्या शस्त्रास्त्रांची जगाला दिसली ताकद

प्रा. सुखदेव बखळे

भारताने ७ मे २०२५ रोजी दहशतवादाविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर'च्या रूपात एक मजबूत आणि अचूक लष्करी कारवाई केली. या निमित्ताने भारताने प्रथमच युद्धात ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रुझ क्षेपणास्त्राचा वापर केला. भारताने नूरखान येथील पाकिस्तानी हवाई तळावर ब्रह्मोस क्षेपणास्त्राने हल्ला केला होता. पाकिस्तानचे अणू कमांड सेंटरदेखील याच ठिकाणी आहे. या हल्ल्यानंतर पाकिस्तान हादरला. ब्रह्मोस क्षेपणास्त्र भारत आणि रशियाने संयुक्तपणे विकसित केले आहे असून उच्च गती, अचूकता आणि 'फायर-ॲण्ड-फर्गेट' वैशिष्ट्यासाठी ओळखले जाते. 'ब्रह्मोस'ने पाकिस्तानमधील दहशतवादी अड्ड्यांवर, विशेषतः बहावलपूरमधील 'जैश-ए-मोहम्मद'च्या मुख्यालयावर हल्ला केला. शत्रूच्या संरक्षण यंत्रणेला चकवा देऊन त्याने मोठे नुकसान केले आणि दहशतवादाविरुद्ध भारताचा दृढनिश्चय दर्शवला. ब्रह्मोस भारताच्या 'डीआरडीओ'ने एका रशियन कंपनीसह संयुक्तपणे विकसित केले आहे. त्याचे नाव भारतातील ब्रह्मपुत्रा नदी आणि रशियातील मोस्कवा नदीपासून बनले आहे. हे क्षेपणास्त्र भारताच्या 'मेक इन इंडिया' कार्यक्रमाचे एक उत्तम उदाहरण आहे. भारत आणि रशियाने यामध्ये त्यांच्या तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आता भारत या क्षेपणास्त्रात स्वतः बनवलेले घटकदेखील जोडत आहे. त्यात एक नवीन इंजिन आणि नेव्हिगेशन चिप जोडली आहे. ब्रह्मोस जगातील सर्वांत वेगवान क्षेपणास्त्रांपैकी एक आहे. ते आवाजापेक्षा तिप्पट वेगाने फिरते. ते थांबवणे खूप कठीण आहे. ते समुद्रावरून फक्त तीन ते दहा मीटर उंचीवर उडते. ते वाटेत अचानक दिशा बदलू शकते. त्यामुळे शत्रूला ते पकडणे आणखी कठीण होते. ब्रह्मोस अनेक प्रकारे लॉंच करता येते. जमिनीवरून ते ट्रकमधून सोडले जाते, जे कुठेही वाहून नेले जाऊ शकते. हे नौदलाच्या जहाजांमधूनही सोडले जाते. हवाईमार्गे हे सुखोई-३० विमानातून सोडले जाते. पाणबुडीतून ते पाण्याखालीही सोडता येते. एकदा प्रक्षेपित झाल्यानंतर हे क्षेपणास्त्र स्वतःहून काम करते. ब्रह्मोस हा भारतीय सैन्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. याचा वापर लष्कर, नौदल आणि हवाई दल करतात. लष्कराकडे ब्रह्मोसच्या चार तुकड्या आहेत. हे क्षेपणास्त्र डोंगरातूनही सोडता येऊ शकते. भारतीय नौदलाच्या अनेक जहाजांवर ब्रह्मोस बसवलेले आहे. ते समुद्रात शत्रूच्या जहाजांना लक्ष्य करते. भारतीय हवाई दलाच्या सुखोई-३० विमानांमध्ये ब्रह्मोस आहे. ते हवेतून शत्रूवर हल्ला करू शकते. भारताने या क्षेपणास्त्राची अनेक वेळा चाचणी केली आहे. ते खूप दूरपर्यंत अचूक मारा करू शकते.




ब्रह्मोस आता इतर देशांमध्येही विकले जात आहे. भारतासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे. पूर्वी त्याची रेंज २९० किलोमीटर होती; पण २०१६ मध्ये भारत एका विशेष गटाचा (एमटीसीआर) सदस्य झाला. यानंतर, ब्रह्मोसची श्रेणी ४००-९०० किलोमीटरपर्यंत वाढवण्यात आली. तथापि सध्या फक्त २९० किलोमीटरचा पल्ला असलेली क्षेपणास्त्रेच इतर देशांना विकली जाऊ शकतात. ब्रह्मोस खरेदी करणारा फिलिपिन्स हा पहिला देश. त्याने ३७५ दशलक्ष डॉलर किमतीचा करार केला. हे क्षेपणास्त्र समुद्र किनाऱ्यावरून शत्रूच्या जहाजांवर हल्ला करू शकते. फिलिपिन्सला तीन बॅटरी देण्यात आल्या आहेत. प्रत्येक बॅटरीमध्ये तीन क्षेपणास्त्रे असतात. या करारामुळे फिलिपिन्सची सागरी सुरक्षा मजबूत होईल. इतर अनेक देश ब्रह्मोस खरेदी करू इच्छितात. यामध्ये व्हिएतनाम, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड आणि ब्रुनेईसारख्या देशांचा समावेश असू शकतो. हे देश दक्षिण चीन समुद्रातील चीनच्या कारवायांबद्दल चिंतेत आहेत. व्हिएतनाम आणि इंडोनेशिया लवकरच ब्रह्मोस खरेदी करू शकतात. याशिवाय ब्राझील, चिली, ओमान, सौदी अरेबिया, इजिप्त आणि दक्षिण आफ्रिकादेखील या क्षेपणास्त्रात रस दाखवत आहेत. रशियालाही ते आपल्या विमानांसाठी खरेदी करायचे आहे. ब्रह्मोसमध्ये आणखी सुधारणा करण्याचे काम सुरू आहे. दोन नवी क्षेपणास्त्रे विकसित केली जात आहेत. ब्रह्मोस-एनजी हे एक लहान आणि हलके क्षेपणास्त्र असेल. ते विमान आणि पाणबुडीतून सोडता येते. त्याची चाचणी या वर्षी केली जाईल. वर्षाच्या अखेरीस ते तयार होऊ शकेल. ब्रह्मोस-२ हे एक हायपरसोनिक क्षेपणास्त्र असेल, जे सहा ते आठपट वेगाने उड्डाण करेल. त्याची मारक क्षमता १५०० किलोमीटरपर्यंत असू शकते. या नवीन क्षेपणास्त्रांमुळे भारताची ताकद आणखी वाढणार आहे. ब्रह्मोसच्या विक्रीमुळे जगात भारताची शक्ती वाढत आहे. हे क्षेपणास्त्र भारताच्या मित्रांना, विशेषतः आग्नेय आशियातील लोकांना मदत करत आहे; पण चीनला हे आवडत नाही. चीनच्या मते हे क्षेपणास्त्र त्याच्या प्रदेशात हस्तक्षेप करत आहे. भारत आपल्या मित्रांच्या सुरक्षेसाठी हे पाऊल उचलत आहे. आता उत्तर प्रदेशात ब्रह्मोस्त्र अस्त्राची निर्मिती केली जात आहे. हे उत्पादन युनिट अवकाश आणि संरक्षण क्षेत्रासाठी उच्च दर्जाचे साहित्य तयार करेल. ते चांद्रयान मोहिमेत आणि लढाऊ विमानांमध्ये वापरले जाईल.

पाकिस्तानने पाठवलेले सहाशेहून अधिक ड्रोन रोखण्यात आणि नष्ट करण्यात भारतीय लष्कराला यश आले. हे ड्रोन पश्चिम सीमा, नियंत्रण रेषा (एलओसी) आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाठवण्यात आले. हवाई संरक्षण प्रणाली हे एक लष्करी तंत्रज्ञान आहे, जे हवेतून निर्माण होणारे धोके रोखण्यासाठी डिझाईन केले आहे. हे धोके ड्रोन, हेलिकॉप्टर, विमाने किंवा क्षेपणास्त्रांमधून उद्भवू शकतात. या धोक्यांचा शोध घेणे, त्यांचे निरीक्षण करून नाश करणे हे त्याचे मुख्य काम आहे. ही प्रणाली एकत्रितपणे काम करणाऱ्या अनेक यंत्रांचा आणि तंत्रज्ञानाचा समूह आहे. हवाई संरक्षण प्रणालीमध्ये अनेक भाग असतात. ते हवाई धोके रोखण्यासाठी एकत्रितपणे काम करतात. प्रथम रडार आणि सेन्सर्स आकाश स्कॅन करतात आणि कोणतीही अज्ञात वस्तू दिसली, तर ताबडतोब कमांड सेंटरला माहिती पाठवतात. हे रडार दिवसरात्र सर्व हवामानात काम करते. धोका आढळतो तेव्हा रडार संबंधित आपत्तीचा वेग, दिशा आणि उंची याबद्दल माहिती गोळा करतो. ड्रोन, क्षेपणास्त्र किंवा विमानासारख्या धोक्याची व्याख्या केली जाते. एकदा धोका ओळखला की तो कसा थांबवायचा हे कमांड सेंटर ठरवते. यासाठी, जमिनीवरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र सोडले जाते. ही क्षेपणास्त्रे धोक्याच्या दिशेने खूप वेगाने जातात आणि नष्ट करतात. अनेक हवाई संरक्षण प्रणाली गतिमान असतात, म्हणजेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज हलवता येतात. यामुळे गरज पडल्यास त्यांना लवकर तैनात करता येते.

पाकिस्तानमधून पाठवलेले ड्रोन पश्चिम सीमा, नियंत्रण रेषा (एलओसी) आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर पाठवण्यात आले. तेव्हा भारतीय सैन्याने हवाई संरक्षण युनिट्सचा वापर केला. त्यामध्ये विविध शस्त्रे होती. एल-७० तोफा, झू-२३ मिमी तोफा, शिल्का प्रणाली आणि विशेष ड्रोनविरोधी तंत्रज्ञानाचा यात समावेश होता. ही शस्त्रे उद्यमपूर, सांबा, जम्मू, अखनूर, नगरोटा आणि पठाणकोटसारख्या भागात तैनात करण्यात आली होती. भारतीय सैन्याच्या वेग आणि अचूकतेमुळे हे धोके पूर्णपणे दूर झाले. भारताकडे इग्ला-१एम, ओएसए-एकेएम, पेचोरा क्षेपणास्त्रे आणि अपग्रेडेड एल-७० तोफादेखील आहेत. भारताची अद्ययावत आणि सुसज्ज शस्त्रप्रणाली आता जगातील अनेक देशांना स्वसंरक्षणप्रणाली विश्वासार्ह वाटायला लागली आहे. त्यामुळे या शस्त्रास्त्रांची निर्यात वाढून भारतीय संरक्षण विभागाची बाजारपेठ वाढू शकेल.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# गरज दृष्टिकोन बदलाची!

आम्ही कायम शासकीय योजनांच्या अपयशाच्या गाथा गातो, वाचतो आणि ऐकवितोही! शेवटी यंत्रणेचा दोष असा निष्कर्ष काढला जातो आणि अपयशाचे खापर यंत्रणेवर फोडून मोकळे होतो. याचा अर्थ यंत्रणा चुकत नाही असे नाही, पण आम्ही कधी आपल्या जबाबदारीचा विचार करतो का? जिथे नातंही आपलेपणाचा भाव असल्याशिवाय टिकत नाही, तिथे तर या शासकीय योजना? त्यांच्याकडे आपण आपलं म्हणून पाहू तरच हेतू साध्य होईल, नाहीतर पैशाचा अपव्यय आणि खानापूर्ती यापेक्षा वेगळं काही नसेल!

शासनाच्या योजना म्हणजे पांढरे कागदं काळे करण्याचा धंदा असाच काहीसा भाव आमचा झाला आहे. योजना आली की ती संबंधित यंत्रणेने राबवावयाची! थेट लाभाच्या योजना असतील तर त्यासाठी तुटून पडायचं, पण जिथे आपले योगदान देण्याचा विषय येतो, तेव्हा ते काम शासकीय यंत्रणेचे म्हणून नामानिराळे व्हायचे, हीच रीत सध्या पाहायला मिळते. योजना शासनाची आहे ना? मग ती यशस्वी व्हावी, याची जबाबदारीही त्यांचीच ही मानसिकता आज चांगले उपक्रम मातीत घालत आहे. शासन जे काही करते, ते आपल्यासाठी याची पुरपूरे जाणीव ठेवून वागणारे आम्ही मात्र ते करताना त्यातही आपला सहभाग असावा, हा विचार जेव्हा करीत नाही, तेव्हा योजनांचा बट्ट्याबोळ होतो.

शासन योजना राबविते. कोट्यवधी रुपये खर्ची घालते. तो पैसा माझा नाही, हा विचार फोफावल्याने योजनांचे अपयश वाढले. पण हा पैसा आपण जे विविध कर भरतो, त्यातून खर्च होतो हे जेव्हा समजेल, तेव्हा आपणही योजनांच्या यशात स्वतःचे योगदान द्यावे, असा विचार नक्की येईल. आम्ही आमच्या खिशातून गेलेल्या एकेका पैशासाठी हळहळतो, तीच हळहळ योजनांच्या अपयशानंतर जेव्हा सामान्यांना वाटू लागेल, तेव्हा मात्र कोणत्याही योजना फसणार नाहीत. हे एवढ्यासाठीच कारण घनकचरा व्यवस्थापन, रोपवन या शासनाच्या लोकांच्याच हिताच्या योजना आज फसल्यागत आहेत. योजना अयशस्वी झाल्या, पैसा खर्च झाला म्हणून बोंबलणारे आम्ही या अपयशात आपले योगदान आहे की नाही, याचा विचार कधी करणार आहोत. गावाशेजारी जंगल या संकल्पनेतून सामाजिक न्याय विभाग आणि वन विभागाने रोपवनाची कल्पना पुढे आणली. पाच ते दहा एकरांमध्ये गावाच्या, शहराच्या शेजारी वन लावण्याचा खटाटोप झाला. यंत्रणेने आपले काम केले. झाडे लावली, कुंपण केले. भविष्यात तयार होणाऱ्या या वनांचा फायदाही लोकांनाच झाला असता, पण हे माझं काम नाही म्हणून दुर्लक्ष करण्याच्या वृत्तीमुळे रोपवनांची वाट लागली. रोपवनात गुरे चरण्यासाठी सोडली गेली. कुंपणाचे तार कापून विकले गेले आणि वनांची दुरवस्था झाली. लावलेली झाडे मोठी होण्याआधीच संपली आणि योजना फसली. आता यात दोष कुणाचा ते शोधायला हवे. यात कोट्यवधींचा निधी खर्च होतो आणि हाती काहीच लागत नाही, त्याचे काय? घनकचरा व्यवस्थापनाची अवस्थाही वेगळी नाही. ग्रामपंचायतींच्या माध्यमातून कचरा व्यवस्थापन करण्यासाठी टाके बांधले गेले. कचऱ्याचे वर्गीकरण, त्याची विल्हेवाट या विषयाचा गंध नसल्याने त्या टाक्यांमध्ये झाडे उगवली आणि हेतू असफल झाला. जिल्ह्यातील ५०० हून अधिक ग्रामपंचायतींमध्ये या टाक्यांमध्ये कचऱ्याचे व्यवस्थापन होण्याऐवजी निधीचे व्यवस्थापन झाले आणि चांगली योजना कचऱ्यात गेली. ही अवस्था केवळ जिल्ह्यात नव्हे, तर राज्यात सगळीकडेच असेल. पण आम्ही दोष यंत्रणेला देऊन मोकळे होतो. गावाशेजारी लावलेले वन जगावे, असे आम्हाला का वाटत नाही. आम्ही त्यासाठी काय योगदान देतो? याचा विचार कधी झाला आहे का? गावातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लागल्याने आमचे आणि गावाचे आरोग्य चांगले राहील, ही भावना मनात न आल्याने कचरा व्यवस्थापनाची अव्यवस्था झाली, याची जाणीव झाल्याशिवाय कधीच कोणत्या योजना यशस्वी होऊ शकत नाही. लोकांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांमध्ये जोपर्यंत लोकसहभागाचा भाव येत नाही, तोपर्यंत कल्याणकारी योजनांचे असेच 'कल्याण' होत राहणार आहे, हे नक्की! आज आम्हाला मानसिकता बदलावी लागणार आहे. केवळ यंत्रणांना दोष देत त्यांच्या माथी अपयशाचे खापर फोडून पराक्रम केल्याचा आव आणत बसण्यापेक्षा आपल्यासाठीच्या या योजना आपल्या सहभागातून पूर्ण व्हाव्यात असा भाव जोपर्यंत मनात येणार नाही, तोपर्यंत कितीही झाडे लावा, त्याचे 'वन' तयार होणार नाही किंवा कचऱ्याचे व्यवस्थापन होऊ शकणार नाही, हे तेवढेच खरे!



९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# समर्थ रामदास स्वामींचे अमराठी वाङ्मय

प्रा. दिलीप जोशी

समर्थ रामदास स्वामींचा 'दासबोध' नावाचा मराठी ग्रंथ सर्वश्रुत असून रामदासी संप्रदायातील तो पंचम वेद आहे. समर्थांचे इतरही मराठी वाङ्मय बहुतेकांना माहीत आहेत. पण त्यांचे मराठी भाषेव्यतिरिक्त अमराठी वाङ्मय आहे, हे बहुतेकांना माहीत नाही. डोंबिवलीला मी व्याख्यानासाठी गेलो असता संघ स्वयंसेवक दीपक कुलकर्णी यांनी मला मनीषा बाठे यांचे समर्थ रामदास कृत अमराठी पदावल्यांचे पुस्तक भेट दिले. ते वाचल्यावर लक्षात आले की, समर्थांच्या अमराठी पदावल्या खूपच प्रेरक, सकारात्मक, परिवर्तक आणि राष्ट्रहितैषी आहेत. राष्ट्रप्रेरक आणि अध्यात्म विज्ञान असलेले अमराठी वाङ्मय बहुतेकांना माहीत नाही. त्याबाबत थोडी माहिती घेऊ.

समर्थांनी रचलेली पदे विविध भाषांत उपलब्ध आहेत. ढोबळमानाने समर्थांनी रचलेले वाङ्मय दखनी भाषा प्रभावित आहे. ज्या भाषेवर मराठीसह गुजराथी, पंजाबी, कानडी, तेलगू, राजस्थानी, संस्कृत, फारशी, अरबी आणि उर्दू यासह एकूण १८ बोलीभाषांचा प्रभाव असलेली भाषा म्हणजे दखनी भाषा होय. काहींच्या मते व्रज, अवधी, बुंदेली, भोजपुरी, मैथिली, मालवी, पहाडी, मारवाडी, गौडी, हैदराबादी अशा बोलीभाषांच्या शब्दांचा यादृच्छिक वापर असलेली भाषा म्हणजे दखनी भाषा. दक्खन प्रांताची भाषा म्हणूनही दखनी भाषा ज्यात फारसी, अरबी, उर्दू शब्दांचा अग्रक्रमाने प्रभाव आहे. ही भाषा कच्छ ते कर्नाटक या भूप्रदेशात मुख्यतः वापरली गेली. समर्थांचे अमराठी वाङ्मय भारतातील बहुतेक सर्व भाषांचे संमिश्रण असलेल्या भाषाशैलीत उपलब्ध आहे.

समर्थांचा कालावधी इ. स. १६०८ ते इ. स. १६८१ असा एकूण ७४ वर्षांचा आहे. त्यातील बालपण आणि तपश्चर्या कालावधी इ. स. १९३१ म्हणजे वयाच्या २४ वर्षांपर्यंत आहे. त्यानंतर देशातील सुलतानी संकटाने समर्थ अस्वस्थ झाले आणि त्यांनी मराठी युवकांमध्ये जागोजागी मारुती मंदिरे, आखाडे याद्वारे बलोपासनेने स्फुलिंग जागरणाचा प्रयत्न सुरू केलेलाच होता. तो प्रयत्न संपूर्ण हिंदुस्थानात करावा म्हणून ते इ. स. १६३२ साली पर्यटनाला निघाले. हा महाराष्ट्राबाहेरील त्यांचा प्रवास इ. स. १६३२ ते इ. स. १६४४ पर्यंत होता. इ. स. १६४५ ला ते पुन्हा महाराष्ट्रात आले. म्हणजे त्यांनी वयाची २५ ते ३८ अशी १२ वर्षे देशाटन केले. त्या त्या प्रदेशात तरुणाई एकत्र करून समर्थांनी ऊर्जा जागरण केले. अभंग, अष्टके, श्लोक यातून राष्ट्रजागृती आणि आखाडे स्थापून बलोपासना शिकविली. या माध्यमातून देव, देश आणि धर्मजागरण केले.

पर्यटन कालावधीत समर्थ अयोध्या, काशी, पंजाबात आनंदपूर ते अफगाणिस्तानपर्यंत गेले. आनंदपुरात ते शीख धर्मगुरू हरगोविंदजी यांनाही भेटल्याचा उल्लेख आहे. तेथून ते दक्षिण भारतात गोकर्ण क्षेत्र, श्रवणबेळगोल, म्हैसूर, श्रीरंगपट्टणम्, बंगळुरू, मद्रास, तंजावर, हैदराबाद ते थेट श्रीलंकेपर्यंत विविध ठिकाणी गेले. त्या काळातील उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बंगाल, गुजराथ, आंध्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, महाराष्ट्र, पंजाब अशा विविध राज्यांत जाऊन एकूण ४७ मठपती आणि त्यांच्या अखत्यारीत असलेले ११०० मठांची स्थापना केली. त्या मठांची यादी उपलब्ध आहे. त्यातील महाराष्ट्राबाहेरील १८ आणि महाराष्ट्रातील ९२ असे एकूण ११० मठ आजही अस्तित्वात आहेत. देशभर पर्यटन करून त्या त्या प्रदेशातील बोलीभाषा वापरून सर्वांना समजेल अशा भाषेतून श्रीरामनाम माहात्म्य, भवसागर पार करण्यासाठीची तत्त्वे, आदर्श आचारविचार, राष्ट्राप्रतीची कर्तव्ये आपल्या वाङ्मयातून समर्थांनी मांडली. समर्थांच्या अमराठी वाङ्मयाच्या काही पदावल्यांतून आपल्या हे लक्षात येईल. संपूर्ण पदावली घेणे शक्य नसले, तरी त्यातील काही पदभाग पाहिल्यावर त्यातील अध्यात्म विज्ञान आपल्या लक्षात येईल.

रामदास कहे एक रामबिन । कोन पार उतारे ॥
ऐसी जानी के सुचित रही । रोसन करी ये दुनिया रे ॥

यात समर्थ सांगतात, हा तुझा भवसागर एका श्रीराम भगवंताशिवाय कोणीही पार करणार नाही. ही बाब चित्तात पक्की धारण कर आणि ते लक्षात ठेवून तुझे हे विश्व देदीप्यमान कर!

अजून एक श्लोक पाहू.

मोहन तन मन ले गयो री । भली न सूचे बुरी न सुचे ।
मैं तो भया बाउरो ॥ अंतरज्यामी अंतर ज्याने ।
रामदास देखत मोहन री ॥

या मोहनाने तनमन हरविले. चांगलेही आणि वाईटही सुचत नाही. तो अंतर्यामी माझे अंतरंग जाणतो म्हणूनच हा रामदास त्या मोहनकृष्णाला पाहू शकतो. मारवाडी, गुजराथी मिश्रित असलेली ही पदावली आहे.

समर्थांना विनाकारण पिंजऱ्यात उभे करणाऱ्यांनी चौफेर साहित्य वाचल्यास त्यांच्या सकारात्मक कार्याचा परिचय होण्यास मदत होईल असे वाटते. समर्थांनी भगवान श्रीकृष्ण वर्णन व्रज भाषेत, संपूर्ण रामायण विशेषतः जनजागरणासाठी युद्धकांड अवधी आणि भोजपुरीतून, नवनाथ कथा खडीबोली भाषेतून, भगवान महादेव चरित्र पहाडी भाषेतून, स्फुट रचना उर्दू, अरबी, फारशी शब्द प्रभाव असलेल्या भाषेत रचलेले आहेत. समर्थांनी श्रीराम कार्य आणि देशकार्य यांची गुंफण घालत राष्ट्रजागरण केले.

आग्र्याहून सुटल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांना सुखरूप पोहोचण्यासाठी विविध ठिकाणी असलेल्या समर्थांच्या अमराठी मठांचे सहकार्य झाल्याचे काहींचे मत आहे. मोगली सत्ता नष्ट होऊन संपूर्ण हिंदुस्थानात हिंदवी स्वराज्य शीघ्रातिशीघ्र स्थापन व्हावे, ही त्यांची आंतरिक इच्छा असल्याचे त्यांच्या साहित्यातून लक्षात येते. शिव छत्रपतींचे स्वराज्य शीघ्र वाढावे यासाठी समर्थांनी तुळजाभवानीला मागितलेले मागणे सारे काही स्पष्ट करते.

'मागणे एकची आता, द्यावे ते मजकारणे ।
तुझा तू वाढवी राजा, शीघ्र आम्हाची देखतां !
मर्द संहारिले मागे, ऐसे उदंड एकतो ।
परंतु आता काही, रोकडे मुळ सामर्थ्य दाखवी ।
दास म्हणे माझे, सर्व आतुर बोलणे ।
क्षमावे तुळजा माते, इच्छा ते पूर्णची करी ॥'

थोडक्यात समर्थांचे मराठी आणि अमराठी वाङ्मय 'ततो राष्ट्रम् बलमोजश्च जातम्' म्हणजे हे राष्ट्र बलसंपन्न होऊन परम् वैभवाला जावे, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांचे साहित्य हिंदुस्थान मोगली सुलतानी संकटातून सुटून आसेतुहिमाचल रामराज्य आणि शिवराज्य व्हावे यासाठीची प्रेरणा देणारे आहे. समर्थांचे अमराठी वाङ्मय वाचण्याची इच्छा सर्वांना व्हावी हा या लेखाचा प्रांजळ हेतू. तस्मात् असा प्रयत्न अभ्यासकांनी करावा, ही विनंती!

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### वाहनाचा वेग आवरायला हवा

आजच्या धावपळीच्या युगात वाहनावरील वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. वेगावर योग्य नियंत्रण असणे आपली सुरक्षितता वाढवते, अपघातांची शक्यता कमी करते आणि इतर प्रवाशांची तसेच पादचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करते. वेगमर्यादा पाळणे, वाहतूक नियमांचे पालन करणे आणि सावधगिरीने वाहन चालवणे या गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. यामुळे आपली आणि इतरांची सुरक्षितता राखली जाते आणि रस्त्यावरील जीवन अधिक सुरक्षित होते.

आजकाल अनेकांना घाई असते, पण त्यामुळे वाहन चालवताना वेग वाढवणे हा उपाय नाही. जास्त वेगात वाहन चालवल्याने अपघातांचे प्रमाण वाढते. रस्त्यावर फक्त आपण नसतो. पादचारी, सायकलस्वार, दुसरी वाहने सगळ्यांचे रक्षण ही आपलीही जबाबदारी असते. नियोजनबद्ध प्रवास करा. वेळेआधी निघा. वेगमर्यादेचे पालन करा. जीवन सुंदर आहे, ते जपायलाच हवं. वाहन चालवताना सावधगिरीबरोबरच नियमांचे पालन करणे आणि इतरांची काळजी घेणे आवश्यक आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्यांचा सदुपयोग करावा

उन्हाळी सुट्या म्हणजे केवळ विश्रांती नाही, तर स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची सुवर्णसंधीसुद्धा होय. वर्षभर अभ्यास, परीक्षा आणि शालेय उपक्रमांमुळे व्यस्त असलेल्या विद्यार्थ्यांना या सुट्यांमध्ये आपल्या आवडीनिवडी जोपासण्यास, नवीन कौशल्ये आत्मसात करण्यास आणि आत्मपरीक्षण करण्यास वेळ मिळतो. मोबाईल स्क्रीनचा वेळ कमीत कमी करून उन्हाळी सुट्यांचा सदुपयोग विद्यार्थी पुढील मार्गाने करू शकतात. वाचनाची सवय लावणे : चांगली पुस्तके वाचल्याने ज्ञान वाढते, विचारसरणी प्रगल्भ होते आणि कल्पनाशक्तीला चालना मिळते. नवीन कौशल्ये शिकणे : संगीत, चित्रकला, नृत्य, पाककला, संगणक वापर किंवा एखादी नवीन भाषा शिकणे हे सर्व कौशल्ये भविष्यात उपयोगी ठरतात. शारीरिक व्यायाम व खेळ : आरोग्य टिकवण्यासाठी दररोज थोडा वेळ मैदानी खेळ किंवा योगासाठी द्यावा. स्वयंशिस्त व जबाबदारी : घरच्या छोट्या छोट्या जबाबदाऱ्या पार पाडत संयम, स्वावलंबन व कुटुंबीयांसोबतचे नाते दृढ करता येते. समाजोपयोगी कार्यात सहभाग : वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, वाचनालयात मदत यासारख्या कार्यांमुळे सामाजिक भान विकसित होते.

उन्हाळी सुटी ही आळस करण्याची वेळ नसून स्वतःला घडवण्याची, नवीन गोष्टी शिकण्याची आणि आयुष्य समजून घेण्याची संधी आहे. योग्य नियोजन आणि सकारात्मक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांनी या सुट्यांचा सदुपयोग केला पाहिजे.

**सुमेघ रामचंद्र वानरे**/९१३००२१३८७

••••

### मन:शांतीसाठी प्रार्थना

प्रार्थना म्हणजे परमेश्वराची कळकळीची विनवणी किंवा आळवणी होय. प्रार्थना या शब्दातील 'प्र' म्हणजे प्रकर्ष तर अर्थ म्हणजे याचना करणे. प्रार्थना म्हणजे स्तुतिवजा याचना होय. हिंदू धर्मात प्रत्येक देवासाठी आरती आहे. ती एक प्रकारची त्या देवाची स्तुती आहे. प्रार्थना म्हणजे ईश्वराशी संवाद. यामुळे ईश्वर आणि मनुष्य यांच्यातील निकट संबंध स्पष्ट होतो. आपल्या धर्मग्रंथांनी, संतांनी प्रार्थनेवर जोर दिला आहे. प्रार्थनेच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. प्रार्थनेत परमेश्वराची स्तुती, गुणगाण, कृतज्ञता, मदतीची अपेक्षा, कर्तेपणा, देवाला देण्याची इच्छा, मार्गदर्शनाची अपेक्षा, दुसऱ्यांच्या हिताचे चिंतन आधी समाविष्ट असते. प्रार्थना एकट्याने किंवा सामूहिक करता येते. कोणतेही साधन नसताना प्रार्थना करता येते. प्रार्थनेत भक्त ईश्वरासमोर आपली सगळी स्थिती स्पष्ट करतो. प्रार्थनेत जितका खरेपणा, तन्मयता, समर्पणाची भावना असेल तेवढी ती तत्परतेने ईश्वरापर्यंत पोहोचते. प्रार्थना सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत प्रत्येक कृतीसाठी करू शकतो. विद्यार्थ्यांनी अभ्यासाला बसण्यापूर्वी प्रार्थना करावी. प्रार्थनेने आत्मविश्वास वाढतो आणि कर्तेपण देवाला दिल्यामुळे अहं कमी होतो. आपल्या संस्कृतीत वसुधैव कुटुंबकम म्हणजे हे विश्वच माझं कुटुंब ही भावना, हा विचार आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदान रचले. ती विश्वाच्या कल्याणासाठी ईश्वराजवळ केलेली प्रार्थना आहे, याचना आहे. सार्वजनिक प्रार्थनेतून बंधुभाव, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम विकसित होतं.

**माधवी पत्की**/नागपूर


### मनपाची युद्धपातळीवर नद्या स्वच्छता

मनपाकडून दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी किंवा त्याच्या तोंडावर नदी व नाल्यांची स्वच्छता केली जाते. या सफाई अंतर्गत नाग, पोहरा आणि पिवळी या नद्यांच्या सफाईचे अभियान सुरू झाले. युद्धपातळीवर (?) सुरू झालेल्या या नद्या सफाई अभियानाची आकडेवारीही देण्यात आली आहे ती अशी- ३९.०४ कि. मी. सफाई, ३० हजार क्यूबिक मीटर गाळ उपसला मनपा आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या निर्देशानुसार नदी स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले. दरवर्षी नद्या, नाले सफाईचे काम केले जाते. दोन वर्षांपूर्वी २२ सप्टेंबरला नागपूरकरांनी जलशिवार योजनेचा अनुभव घेतला. अभियानांतर्गत तुम्ही सफाई करत पाण्याच्या प्रवाहाने वाहून आलेला कचरा नाल्यांच्या कडेलाच काढून ठेवला आणि परत पुढच्या वर्षीचे अभियान येतपर्यंत तो त्या पात्राच्या कडेनेच साचलेला असतो. त्यातला बराच पाण्याच्या प्रवाहात वाहून जातो. मग कसली सफाई न कसले काय?

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)







बीड शहरातील विविध भागात रस्त्यावर पाणी साचले व वाहन चालकांना पाण्यातून वाट काढावी लागली दुसऱ्या छायाचित्रात बिंदुसरा नदी वाहु लागली तिसऱ्या छायाचित्रात संभाजी महाराज क्रीडांगणावर असे पाणी साचले होते (छाया कृष्णा शिंदे)

# बिंदुसरेच रुपडं पालटतय तहसीलदार शेळके



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मे**

बीड शहर बिंदुसरा नदीच्या काठी वसलेले आहे , असे आपण अभिमानाने म्हणतो . परंतु या बिंदुसरेत जाऊन कधी पाहिले आहे का ? जागोजागी वाढलेली झूडपे , गाळ , कचरा याचे साम्राज्य सर्वत्र दिसून येते . बीडचे नवीन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नेमकी हीच बाब हेरून बिंदुसरा नदीच्या सौंदर्यीकरणाची संकल्पना पुढे आणली . दिनांक २० मे रोजी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , माजी आमदार सय्यद सलीम , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक कविता जाधव , मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी बिंदुसरा नदीच्या स्वच्छतेची मोहीम सुरू केली.सोमेश्वर मंदिर ते खासबाग मंदिर , दगडी पुल ते यशवंत उद्यान , यशवंत उद्यान ते नवा मोंढा पूल , नवा मोंढा पूल ते श्रीकृष्ण मंदिर या भागातून मुख्यतः बिंदूसरा नदीचे पात्र शहरात आहे . या नदीची स्वच्छता , प्रवाह मोकळा करण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे . बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या स्वच्छतेसाठी २५ लाखाचा आमदार फंड निधी देण्याचे कबूल केले आहे . खोलीकरणाच्या व सौंदर्यीकरण्याच्या या कामासाठी जलसंपदा विभाग व नाम फाउंडेशनतर्फे आठ पोकलेन , आठ जीसीबी व दहा टिप्पर इतकी मशनरी उपलब्ध करून देण्यात आली आहे .

बुधवार दिनांक २८ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी यशवंत उद्यान जवळ या कामाची पाहणी केली . या वेळी उपमुख्याधिकारी सम्राट कदम , स्वच्छता विभागाचे विश्वंभर कदम , मंडळ अधिकारी अनिल तांदळे , तलाठी शरद घोडके , तलाठी जगन्नाथ राऊत व कर्मचारी उपस्थित होते . यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हटले की बिंदुसरेच्या खोलीकरण व सौंदर्यीकरण करण्याच्या या कामी सामाजिक संघटना , दानशूर व्यक्ती यांनी सुद्धा आपला सहभाग नोंदवावा . आपल्या शहराची बिंदुसरा नदी ही शान आहे.नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी सम्राट कदम यांनी नमूद केले की पावसाळ्यात पूररेषेच्या अंतर्गत राहणाऱ्या नागरिकांनी स्वतःच्या जीविताची व मालमत्तेची काळजी घ्यावी . प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे.

# स्वा.सावरकर महाविद्यालयात सावरकर जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मे**

ज्या हातांनी बॉम्ब हाताळले, क्रांतीचा यल्गार करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले, क्रांतिकारकांची फौज उभी केली, 'शरण नाही रण' हा मूलमंत्र दिला त्याच हाताच्या बोटांनी महाकाव्य साकारली. क्रांती आणि कवितेचा सुरेल संगम स्वातंत्र्यवीर सावरकर होते असे प्रतिपादन डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात आयोजित सावरकर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी डॉ. सारिका क्षीरसागर, संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, प्रमोद कुलकर्णी, महेश वाघमारे, डॉ.रमाकांत निर्मळ, मधुकर वैद्य, गजानन जगताप, अजिंक्य पांडव, प्रशांत सुलाखे, नितीन धांडे, बालाजी पवार, विजेंद्र चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ.उत्तम साळवे, मुख्याध्यापक विठ्ठल काळे, मुख्याध्यापिका बालिका देशमुख यांची उपस्थिती होती. डॉ. बाहेगव्हाणकर पुढे बोलताना म्हणाले की अभिनव भारत संघटनेच्या माध्यमातून क्रांतिकारकांची फळी सावरकरांनी निर्माण केली. इंग्रज सरकारला जेरीस आणले. लंडन वरून भारतात पिस्तुले पाठवली. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळे' हा मंत्र दिला. मदनलाल धिंग्रा, अनंत कान्हेरे असे अनेक क्रांतिकारक निर्माण केले. तरुणांना सशस्त्र क्रांतीचा मार्ग दाखवला. तेच सावरकर कविता लिहिताना कल्पनेचे पंख लावून उंच भराऱ्या घेतात. प्रतिभेची लेखणी आणि क्रांतीची मशाल या दोन्हीचा एकत्रित संगम म्हणजे सावरकरांचे व्यक्तिमत्व आहे.प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे म्हणाले की सावरकरांच्या साहित्याचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे, प्रत्येकाने सावरकरांच्या साहित्याचे वाचन केले पाहिजे. डॉ. सारिका क्षीरसागर म्हणाल्या की सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग दाखवून युवकांना प्रेरित केले. भविष्यात बीडमध्ये सावरकरांच्या साहित्याचा अभ्यास करण्यासाठी सुसज्ज असे वाचनालय उभे करण्यात येईल असे त्या म्हणाल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की सावरकरांच्या साहित्यावर संशोधन करण्यासाठी महाविद्यालयातून सर्वतोपरी मदत केली जाईल. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, सावरकर संकुलातील कर्मचारी, प्राध्यापक,शिक्षक यांची उपस्थिती होती.

# आषाढी वारी पर्यंत उड्डाणपूलाचे काम स्थगित करावे-गोपाळ आंधळे




**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ मे**

वारकरी संप्रदायाची सर्वात मोठी आध्यात्मिक पर्वणी म्हणून ओळख असलेली पंढरपूरच्या आषाढी वारीला सुरूवात होत आहे.परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रात विदर्भ आणी इतर भागातून शेकडो दिंड्या मुक्कामी शहरात दाखल होत असतात.त्या सर्व वारकर्यांची गैरसोय होवू नये. या साठी शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाचे प्रस्तावित काम आषाढी एकादशी पर्यंत स्थगित करावे अशी मागणी न.प.चे माजी शिक्षण सभापती गोपाळ आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

वारकरी संप्रदायाचे व सबंध महाराष्ट्राचे आराध्य दैवत.पंढरीचा पांडुरंग परमात्मा श्रीविठ्ठलाचा आषाढी वारीचा सोहळा अगदी कांही दिवसांनी सुरू होत आहे.परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र असल्यामुळे खास करून विदर्भातील शेकडो दिंड्या या परळी शहरात मुक्कामी असतात. परंतु प्रस्तावित शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाच्या दुरुस्तीच्या कामामुळे हा पुल वाहतूकीसाठी दिर्घकाळ बंद ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.हा पुल बंद झाल्यावर वारकर्यांची मोठी गैरसोय होणार तर आहेच .परंतु अनादी काळापासून चालत आलेली परळी मुक्कामाची परंपरा बंद होईल.त्यामुळे प्रशासनाकडून हे प्रस्तावित काम आषाढी वारी संपन्न झाल्यावरच पुलाच्या दुरूस्तीचे काम करावे अशी मागणी माजी शिक्षण सभापती गोपाळ आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केली आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत डॉ.ज्योती मेटे यांनी घेतली कलेक्टरची भेट




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मे**

बि -बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

# मारफळा येथे वीजेचा शॉक लागून बाप लेकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२८ मे**





गेवराई तालुक्यातील मारफळा येथे उसाच्या शेतामध्ये खत देण्याचे काम करत असलेल्या बाप लेकाला विद्युत तारेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अभिमान कबले आणि ज्ञानेश्वर कबले असं पिता-पुत्राचं नाव आहे. दोघेजण आपल्या शेतात काम करत असताना त्या ठिकाणी विद्युत तार खाली पडलेली होती. त्यात प्रवाह असल्याने दोघांनाही त्याचा शॉक लागला. दोघांना बीडच्या जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. महावितरणच्या गलथान कारभाराचा फटका आता या शेतकऱ्यांच्या जीवावर बेतला असून जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी गावकऱ्यांमधून केली जात आहे.

# बीड जिल्हा भाजपा व संस्कार भारतीच्या वतीने महिला मेळावा व रांगोळी स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मे**

बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने महिला मेळावा व रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आजच्या पिढीला समजन्यासाठी भारतीय जनता पार्टी विविध कार्यक्रम आयोजित करत आहे .सदर रांगोळी स्पर्धा ही दोन गटात होणार असून वय वर्ष पाच ते पंधरा असा मुलींचा गट असून पंधरा वर्षांपूर्वी महिलांचा दुसरा गट करण्यात येणार आहे या दोन्ही गटात सहभागी होणाऱ्या मुली व महिलांसाठी स्वतंत्रपणे बक्षीस दिले जाणार असून बीड शहरातील व जिल्ह्यातील मुली आणि माहीलानी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे आध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.भारतीय जनता पार्टी आणि संस्कार भारतीयांच्या स्वस्त विद्यमान आयोजित करण्यात आलेली ही रांगोळी स्पर्धा दिनांक ३० मे रोजी सकाळी अकरा वाजता अमृत मंगल कार्यालय येथे होणार असून दुपारी दोन वाजता महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेसाठी संस्कार भारतीची सर्व टीम भारतीय जनता पार्टीला सहकार्य करत असून संस्कार भारती व भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी देखील या स्पर्धा आणि मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शंकरराव देशमुख यांनी केले आहे.

# जिजांनी सदैव लेकीसारखी माया आणि 'ताईसाहेब म्हणत नेता म्हणून सन्मान केला

**देशमुख परिवाराला कधीही अंतर देणार नाही - ना.पंकजाताई मुंडे**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ मे**



स्व. आर.टी. देशमुख (जिजा) यांच्यासारखा जीवाभावाचा देवमाणूस आता पुन्हा होणे नाही. माझ्या संपूर्ण जीवनात एक परिवारातील सदस्य म्हणून त्यांनी सदैव माझ्यावर लेकीसारखी माया केली आणि मी नेतृत्व करताना 'ताईसाहेब' म्हणत नेता म्हणून माझा सन्मान केला. अशा सालस, सोज्वळ व निष्ठावान व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने खूप मोठी हानी झाली आहे. त्यांच्या माघारी देशमुख परिवाराला मी कधीही अंतर देणार नाही अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी स्व.आर.टी. देशमुख यांना अखेरचा निरोप दिला.

माजलगाव मतदार संघाचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचे परवा दुर्दैवी अपघाती निधन झाले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आपले सर्व कार्यक्रम व दौरै रद्द करून त्या या कुटुंबाला आधार देत तीन दिवस परळीतच थांबल्या. स्व.आर.टी. देशमुख यांच्या पार्थिवावर आज शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.ना.पंकजाताई मुंडे यांनी सरकारच्या वतीने त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

# जिजा भाऊंच्या अकाली निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास मुकलो-धनंजय मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२८ मे**

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते आर टी जिजा देशमुख यांच्या निधनाने एक मार्गदर्शक नेतृत्वास आपण मुकलो आहोत. त्यांच्या अकाली अपघाती निधनाने बीड जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे यांनी आर. टी. देशमुख यांच्या अपघाती निधनाबद्दल ट्विट करून शोक व्यक्त केला असून, आर. टी. जिजा देशमुख हे स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब तसेच स्व. पंडित अण्णा मुंडे यांचे जिवलग सहकारी म्हणून सर्वपरिचित होते. माझ्या राजकीय व सामाजिक जडणघडणीत देखील जिजा भाऊंचे एक अढळ स्थान आहे. मुंडे आणि देशमुख कुटुंबाचे पिढीजात नाते असून, आज त्या नात्यातील आणखी एक छाया आम्हाला पोरके करून गेली, अशी भावनिक प्रतिक्रिया धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

माजी आमदार आर. टी. देशमुख यांचे आज लातूर जिल्ह्यात प्रवासादरम्यान अपघाती निधन झाले असून, त्यांच्या अकाली निधनाने संपूर्ण बीड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. आपण संपूर्ण देशमुख कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत धनंजय मुंडे यांनी आर. टी. जिजा देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# बीड शहरात उद्या रिपाइंच्या वतीने भारत झिंदाबाद यात्रेचे आयोजन:पप्पू कागदे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२८ मे**

जम्मू कश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठ्ठावीस जणांची क्रूर हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिंदूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशत वाद्यांची ठिकाणी उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी भारतीय सैनिकांनी केलेल्या सिंदूर ऑपरेशनच्या यशाबद्दल रिपब्लिकन पक्षाच्यावतीने या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलिदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड शहरात दि. ३० मे २०२५ शुक्रवार रोजी रिपाइंच्या वतीने सकाळी ठीक ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेस सुरुवात करण्यात येणार आहे. भारत जिंदाबाद यात्रा साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार असल्याची माहिती भारत जिंदाबाद यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

बीड शहरात जिल्हा रिपाइंच्या वतीने काढण्यात येणारी भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष, महिला आघाडी पदाधिकारी, युवा रिपाइं पदाधिकारी यांच्यासह रिपाइं कार्यकर्त्यांनी भारत जिंदाबाद यात्रेत हजारोच्या संख्येने सामील होऊन भारत जिंदाबाद यात्रा यशस्वी करावी असे आवाहन यात्रेचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोहा शहरातून ए.टी.एम. मशिन लंपास

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.२८ मे-**

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक नेहमीच गजबजलेला असतो पण चोरट्यांनी पाळत ठेवून शिवनेरी महाराष्ट्र बार हॉटल समोरील खाजगी कंपनी जैन नामक कंपनिचे चालु स्थीतीत असलेले ए.टी.एम.मधील रक्कमेसह मशिन लंपास केले. ही घटना सोमवारी मध्यरात्री घडली. लोहा पोलिस ठाण्यात आंबर दिव्यासह दोन ते तीन वाहन असुन रात्रीला या वाहनांची गस्त कुठे होती असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आली आहे.

लोहा शहरातील शिवाजी चौकात नेहमीच वाहन व नागरिकांची वर्दळ चालू आसते.या




चौकातून लोहा ते नांदेड, कंधार ,लातुर व शहरात येण्यासाठी चारही दिशेला ऐसपैस मोठे रस्ते आहेत. या रस्त्यावरुन नेहमीच कोणते ना कोणते वाहन व नागरिक ये जा करत असतात. लोहा ते गंगाखेड रोड लगत ए.टी.एम.मशिन बसवलेली एटीएम रुम आहे, या ए.टी.एम मशिन रुमच्या पाठीमागे शिवनेरी महाराष्ट्र बार व लॉजिंग हॉटेल आहे. दहा ते पंधरा फुटांवर छ. शिवाजी महाराज स्मारकाचे काम चालू आहे. शिवाजी चौकातील जिल्ह्यात प्रसिद्ध असलेले कापडाचे सोनी क्लाथ सेंटर तीन मजली दुकान आहे या ठिकाणी मोठी सि.सी.टिव्ही ची यंत्रना आहे. मग ए.टी.एम.मशिन रुमला सि.सि.टिव्ही यंत्रना होती की नाही हे कळाले नाही. अशा ठिकाणावर चोरट्यानी पाळत ठेऊन रक्कमेसह मशिन लंपास केली. हि घटना पोलिसासमोर मोठे आव्हान आहे.

शहरात चोरट्यांचा धुमाकूळ चालू आहे. शिवाजी चौकात बनसोडे नामक यूवकाचे मेडीकल आहे दोन दिवसा पुर्वी तोंडाला काळा रुमाल बांधून आले गळ्याला हात्यार लावून गळ्यातील सोन्याची मौल्यवान वस्तु घेऊन पसार झाले याचा आजुन शोध लागला नाही तर दुसरी घटना घडली. जैन ए.टी.एम मशिन मध्ये मोठी रक्कम काल संध्याकाळी भरली होती.अशी माहिती आहे. कंपनीच्या अधिकृत व्यक्तीने पाच वाजेपर्यंत पोलिसात तक्रार दिली नव्हती, रक्कमेसह ए.टी.एम.मशिन लंपास केली याचे कारण काय ? ए..टी.एम.मशिनची जबाबदारी कुणाची ?, या ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात होता की नाही असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# किनवट नगर परिषद निवडणुकीचे वारे जोरात; आरक्षणाच्या चर्चांनी शहरात खळबळ

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२८ मे-**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची लगबग सुरू झालेली असताना किनवट शहरातही नगर परिषद निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. २०१७ साली झालेल्या नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पद मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गासाठी आरक्षित होते. यंदा आरक्षणाच्या चक्रानुसार नगराध्यक्ष पद सर्वसाधारण (खुला) प्रवर्गासाठी आरक्षित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शहरात राजकीय चर्चांना चांगलाच ऊत आलेला आहे.

**आरक्षणाचे संभाव्य स्वरूप**

सूत्रांनुसार, यंदाच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पद खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण पुरुष किंवा महिला, तसेच अनुसूचित जाती (डउ) महिला या संवर्गासाठी आरक्षित राहण्याची शक्यता असून त्याबाबत अंतिम निर्णय राज्य निवडणूक आयोगाकडून होणार आहे. सध्या उपलब्ध असलेल्या माहितीवरून स्थानिक जाणकारांनी हे विश्लेषण केले आहे.

**शहरात चर्चांना उधाण**

या संभाव्य आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर किनवट शहरातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात उत्सुकता वाढली आहे. चहा टपऱ्या, पान शॉप्स, चौकातील कट्टे आणि समाजमाध्यमांवरही या संदर्भातील चर्चांना उधाण आले आहे. पुढील चार महिने हे चर्चाचक्र चालू राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**पक्षांची रणनीती आणि आव्हाने**

यंदाच्या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी हे दोन प्रमुख गट एकमेकांसमोर असतील का, की सर्व पक्ष आपले स्वतंत्र उमेदवार मैदानात उतरवतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सध्या किनवट शहरात सहा प्रमुख राजकीय पक्ष सक्रिय आहेत. त्यामुळे प्रत्येक पक्षासमोर उमेदवारांची निवड आणि बंडखोरी टाळणे ही प्रमुख आव्हाने असतील.

**उमेदवारांची छुपी तयारी**

अद्याप निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला नसला तरी इच्छुक उमेदवारांनी गुप्त प्रचार आणि जनसंपर्क सुरू केले आहेत. मतदार यादीतील फेरबदल, संपर्क मोहीम, स्थानिक प्रभागात होणारी हालचाल यावरून त्यांच्या हालचाली स्पष्टपणे जाणवू लागल्या आहेत.

**निवडणूक आयोगाची कार्यवाह**

राज्य निवडणूक आयोगाकडून आगामी आठवड्यांत आरक्षणाचा अंतिम आराखडा आणि निवडणूक कार्यक्रम जाहीर केला जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर अधिकृत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. निवडणुकीचा कार्यक्रम आणि आरक्षणाची अंतिम यादी जाहीर होईपर्यंत शहरातील राजकीय वातावरण तापलेले राहणार, हे निश्चित.


**निवडणूक विशेष**

२०१७चे आरक्षण: ओबीसी (नगराध्यक्ष पद), संभाव्य आरक्षण (२०२५): खुला / अनुसूचित जाती महिला, प्रमुख पक्ष: सहा (महायुती, महाविकास आघाडी व अन्य), मुख्य मुद्दे: बंडोबा व्यवस्थापन, गुप्त प्रचार, आरक्षण स्पष्टता

## संक्षिप्त वृत्त

### बेमोसमी पावसापासून जनावरांची विशेष काळजी घ्या

**नांदेड** -राज्यातील अनेक भागांत बेमोसमी पाऊस पडत असल्याने जनावरांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, असा सल्ला जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले यांनी दिला आहे. पावसामुळे दमट हवामान तयार होते, ज्यामुळे गोठ्यातील ओलसरपणा वाढतो. परिणामी, विविध जंतू, विषाणू व बुरशीजन्य आजारांचे प्रमाण वाढते. गोचीड, गोमाशा, डास यांचा त्रासही अधिक होतो. त्यामुळे गोठा स्वच्छ आणि कोरडा ठेवणे, तसेच जनावरांवर व गोठ्यात कीटकनाशक फवारणी करणे आवश्यक आहे. दुधाळ जनावरांमध्ये कासदाह व इतर संसर्गजन्य आजार होण्याचा धोका असतो. त्यामुळे कास स्वच्छ ठेवणे, पोटॅशियम पर्मँगनेटच्या द्रावणाचा वापर करणे आणि वेळेवर लसीकरण करणे गरजेचे आहे. घटसर्प, पोटफुगी, बुळकांडी, सर्दी-पडसे यांसारख्या आजारांपासून बचावासाठी प्रतिबंधात्मक उपाय करावेत. जनावरांच्या आहारात ओल्या हिरव्या चाऱ्यासोबत सुका चारा, खनिज आणि जीवनसत्त्वयुक्त खाद्य द्यावे. पावसाळ्यात खाद्यावर बुरशी येण्याची शक्यता असते, त्यामुळे साठवणूक काळजीपूर्वक करावी. तसेच पिण्याच्या पाण्याची स्वच्छता राखावी. नवजात वासरांपासून व्यायल्यानंतरच्या जनावरांपर्यंत पावसाळा संवेदनशील असतो. त्यामुळे गोठ्यातील व्यवस्थापन व पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार उपचार करणे आवश्यक असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले व पशुधन विकास अधिकारी डॉ. श्यामसुंदर पवळे यांनी सांगितले.



छायाचित्र नरेंद्र गडप्पा



नांदेड- शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतिने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली खा. रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत जय जवान जय किसान तिरंगा महारॅली काढण्यात आली.

# श्री. सुभाष शुगरमध्ये चेअरमन यांच्या हस्ते मील रोलरचे सपत्नीक पुजन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२८ मे-**

श्री. सुभाष शुगर या हदगांव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी कामधेनू ठरलेल्या साखर कारखान्यातील मील रोलरचे या कारखान्याचे चेअरमन सुभाषराव देशमुख यांनी नुकतेच सपत्नीक पुजन केले. गाळप क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल केले जात आहेत. यावर्षी उसाने भरून आलेले वाहन खाली होण्यास वेळ लागण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही अशी ग्वाही चेअरमन देशमुख यांनी दिली.

हदगाव शहरात जवळच हडसणी शिवारात असलेल्या हुतात्मा जयवंतराव नगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परिसरातील श्री सुभाष शुगर हा भव्य साखर कारखाना मागील चार वर्षापासून ऊसाचे मोठ्या प्रमाणात गाळप करीत आहे. यावर्षी आणखी गाळपक्षमता तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मशिनरीज मध्ये बदल करण्यात आला आहे. मागील दोन महिन्यापासून क्लिनिंग व काही मशिनरी, पॅन व आवश्यक ती यंत्रे बदलण्याचे काम झालेले आहे. हे कामे गाळप हंगामात ऐनवेळी कोणतेही काम निघू नये, व गाळपामध्ये व्यत्यय येऊ नये यासाठी पूर्व तयारी म्हणून सर्व दुरुस्ती करून घेतलेली आहे. मागील गाळप हंगामात झालेल्या गाळपापेक्षा पुढील वर्षी दीडपटीने अधिक गाळप करण्याची क्षमता या कारखान्याची तयार झालेली आहे. आता पुढील गाळप हंगामासाठी अंतर्गत कामे करतांना अगोदर मिल रोलरचे पूजन करण्याची प्रथा आहे. त्यानुसार



दिनांक २३ मे रोजी शुक्रवारी शुभ मुहूर्तावर हे रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख व त्यांच्या अर्धांगिनी सौ. विजयाराजे सुभाषराव देशमुख यांच्या हस्ते विधिवत पूजा करून संपन्न झाले. याप्रसंगी श्री सुभाष शुगरचे कार्यकारी संचालक सुशील कुमार देशमुख, संचालक यशवंतराव देशमुख, जनरल मॅनेजर राजेश मानधना, शिऊर साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर संभाजी नातू, डेप्युटी जनरल मॅनेजर मधुकरराव पतंगे, मुख्य शेतकी अधिकारी किशोर वानखेडे, शेतकरी प्रतिनिधी पंजाबराव हरडफकर, शेतकरी नेते दत्तराव सुकळकर, प्रल्हाद पाटील हडसनीकर, श्री सुभाष शुगर व शिऊर शुगरचे सर्व विभाग प्रमुख तसेच प्रमुख कर्मचारी आणि अनेक कामगार उपस्थित होते.

अविरतपणे व पुर्वीपेक्षा जास्त गाळप क्षमतेने हा कारखाना सुरू असल्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उसाची लागवड केलेली आहे. त्यासोबतच बाजूच्या यवतमाळ जिल्ह्यातील देवसरी, चालगणी, लोहरा, खरूस, चातारी, ब्राह्मणगाव, कोपरा, मानकेश्वर, बोरी, उचडद, दिघडी या गावांसह हिमायतनगर तालुक्यातील व उमरखेड, कळमनुरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी श्री सुभाष शुगर या साखर कारखान्याच्या भरवशावर फार मोठ्या प्रमाणात ऊसाची लागवड केलेली आहे. आजूबाजूच्या सर्व तालुक्यापेक्षा हदगांव तालुक्यामध्ये सर्वाधिक म्हणजे फक्त एकट्या हदगांव तालुक्यामध्ये सहा लाख टना पेक्षाही अधिक ऊस उपलब्ध होणार आहे. परंतु यातील बाजूचा वसंत सहकारी साखर कारखाना भाऊराव सहकारी साखर कारखाना इत्यादी कारखान्याला सुद्धा येथील शेतकरी ऊस देतात.

**वाहनांसाठी आता बारकोडची सिस्टीम**

मागील गळीत हंगामात तोड व वाहतूक यंत्रणा मोठ्या प्रमाणात भरली होती. त्यामुळे अनेक वेळा ऊसाने भरून आलेली वाहने लवकर खाली होत नव्हती. परंतु यावर्षी असे होऊ नये म्हणून उपाययोजना केलेली आहे. त्यामुळे काही तासातच वाहन खाली होणार आहे. यावर्षी मात्र ऊस घेऊन आलेल्या वाहनांसाठी आता बारकोडची सिस्टीम राबविण्यात येणार आहे. ऊस उत्पादकांना आहे त्याच क्षेत्रामध्ये अधिक उत्पादन काढण्यासाठी ख प्रणालीचा (कृत्रिम बुद्धिमत्ता) वापर करून कसे उत्पादन वाढवायचे याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. अशी माहिती जनरल मॅनेजर राजेश मानधना यांनी दिली.

# लढा कर्जमुक्तीचा; दुसऱ्या टप्प्यात २५० अर्ज दाखल



**तभा वृतसेवा**
**माहुर, दि.२८ मे-**

राज्याच्या सत्तेवर आल्यास शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करु! असे आश्वासन विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या वतीने शेतकऱ्यांना देण्यात आले होते. पण सत्तेत येऊन पाच महिने उलटले तरी हे आश्वासन पूर्ण न झाल्याने आधीच अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या बळीराजाची अवस्था राज्यकर्त्यांच्या फोल आश्वासनाने आसमान से टपका और खजूर में अटका अशी अधांतरी लटकल्यागत झालेली आहे. सरकारला दिलेल्या आश्वासनाचा सोईस्कर विसर पडला असल्याने त्याची आठवण करून देण्यासाठी कर्जमुक्ती लढा उभारलेल्या किसान ब्रिगेडच्या वतीने दि.२६ मे रोजी तालुक्यातील उर्वरित शेतकऱ्यांचे कर्जमुक्ती अर्ज भरण्याचा दुसरा टप्पा राबविण्यात आला. यावेळी २५० कर्जमुक्तीचे अर्ज भरून तहसील कार्यालयात दाखल करण्यात आले.

किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष, लोकनेते प्रकाश पोहरे यांच्या नेतृत्वात पुरुषोत्तम गावंडे यांच्या मार्गदर्शनात राज्यात शेतकरी कर्जमाफीचा लढा उभारण्यात आला असून, किसान ब्रिगेडच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्वच कर्जबाजारी शेतकऱ्यांची कर्जमुक्ती अर्ज भरण्याचे व्यापक शेतकरी आंदोलन सुरू करण्या आले आहे.त्यानुसार माहूर तालुका किसान ब्रिगेडचे जिल्हा संघटक अविनाश टनमने यांच्या उपस्थितीततालुक्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय येथे नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड यांच्याकडे २६ मे रोजी अर्ज दाखल करत कर्जबाजारी शेतकऱ्यांची व्यथा शासनाकडे पाठविण्याचे साकडे घातले.

दरम्यान, किसान ब्रिगेडच्या वतीने याआधी राबविण्यात आलेल्या कर्जमुक्ती अर्ज भरण्याच्या पहिल्या टप्प्यात तालुक्यातील १ हजार शेतकऱ्यांनी आपल्याला कर्जमुक्त करावे अशी विनंती वजा मागणी करत शेतकरी कर्जमुक्ती अर्ज तहसीलदार किशोर यादव यांच्या कडे सादर केले होते. त्याचाच दुसरा टप्पा सोमवारी २६ रोजी किसान ब्रिगेडच्या वतीने राबविण्यात आला.

यावेळी आगाखान पठाण, संदिप टनमने, सुधाकर निलेवाड, प्रविण मार्कंड, राजेश टनमने, जिया खान फारूखी, धम्मदिप खिल्लारे, शंकर चव्हाण यांच्यासह तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी एचटीबीटी कापूस बियाणे खरेदी व पेरणी करु नये

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२८ मे-**

शेतकऱ्यांनी एचटीबीटी कापसाचे बियाणे विकत घेवू नये किंवा पेरणी करू नये. अधिकृत व प्रमाणित कंपन्यांचेच बी.टी. बियाणे खरेदी करावे. शंकास्पद बियाणे विक्रेत्यांची माहिती तात्काळ नजिकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयास कळवावी व शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

सध्या खरीप हंगाम २०२५ ची लगबग सुरु आहे. ग्रामीण भागात कपाशी लागवडीसाठी बियाणे खरेदीची लगबग सुरु आहे. एचटीबीटी ही एक अनधिकृत जैवतंत्रज्ञान आधारित कापसाची जात आहे. जी अद्याप भारत सरकारकडून अधिकृतपणे मान्यता प्राप्त नाही. एचटीबीटी बियाण्यांचे उत्पादन, विक्री व पेरणी ही अनधिकृत व बेकायदेशीर आहे, असे केल्यास बी.टी. बीज कायदा, पर्यावरण संरक्षण कायदा, व अन्य संबंधित कायद्यानुसार गुन्हा ठरतो.

एचटीबीटी बियाण्यांची उत्पत्ती, कार्यक्षमता व परिणाम याबाबत कोणतीही खात्री नाही. रोगप्रतिकारक शक्ती, उत्पादन क्षमता आणि बाजारातील मागणी यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

# भर पावसात रस्त्याचे डांबरीकरणाचे काम



**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.२८ मे-**

भर पावसात रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्याचा आजब प्रताप सुरु आहे. विशेष म्हणजे भर पावसात पाणी पडत असतांना, बाजुला पाणी साचलेले असतांना देखील डांबर टाकण्याचा प्रताप येथे सुरु होता. स्थानिकांनी जाब विचारला असता संबंधित गुत्तेदाराने कोणालाही न जुमानता भरपावसात काम केले.

महामार्गापासून दाभड ते शेलगांव या २.९४ किमीचे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून १ कोटी ५ लाख ९५ हजारांचा निधी मंजूर झाला होता. कंत्राटदाराकडून या रस्त्याचे काम तब्बल एक वर्षे उशीरा केले होते. आता रस्त्याची चक्क चाळणी झाली असतांना गत दोन महिन्यांपूर्वी रस्ता दुरुस्तीच्या थातुरमातुर दुरुस्तीला सुरूवात झाली होती. दुरूस्तीचे निकृष्ट काम होत असतांना स्थानिकांनी संबंधित विभाग गाठुन अधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.

दि.२५ रविवार रोजी भरपावसात डांबरीकरणाचे काम सुरू होते, दिड महीन्यानंतर थांबलेले काम पाऊस पडतांना सुरू केले असून गुत्तेदारास अधिकारी मेहेरबान असल्याची चर्चा परिसरात होत असून तालुक्यातील शेलगाव येथील थातुरमातुर होणारे काम रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आहे.

# कोलंबीतील शंकरराव चव्हाण विद्यालयात गुरु- शिष्यांचा अनोखा स्नेह मेळावा



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२८ मे-**

श्री शंकराव चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कोलंबी येथील१९९८ -९९ च्या इयत्ता दहावी च्या बॅच मधील विद्यार्थ्यांनी तब्बल २६ वर्षांनी कोलंबी येथील प्रवीण बियाणी यांच्या फॉर्म हाऊस येथे मंगळवारी सर्व वर्ग मित्रांचा मैत्रीचा अनोखा स्नेह सोहळ्याची भरविली शाळा

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ जिल्हा परिषद शिक्षिका बिडवई मॅडम या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून, पी . बी.वाघमारे ,वाय. एफ आदमनकर सर, व्हि. जी.आमिलकंठवार, लक्ष्मण कंधारे , आडेपवार सर, ए.एच.बामणे सर,बी एस नीलावार,एन.आर.पांडे सर ,सिरसे एस.बी., एस. एन.रामशेटवाड सर , हे उपस्थितीत होते.

या वेळी सर्व प्रमुख अतिथी विद्यार्थी, यांनी आपले मनोगत व अनुभव कथन व्यक्त केले.शेवटी त्या काळातील विद्यार्थी गौस मस्तान सय्यद यांनी गायिलेल्या मैत्रीच्या आठवणीचा धागा स्पष्ट पने उमटला .उत्कृष्ट चित्रपट गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली .शेवटी मयत झालेल्या गुरुवर्य, व विद्यार्थी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद पानगटवाड यांनी तर कार्यक्रमाचे संचलन बालाजी परिहार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार रत्नप्रदीप मुधळे यांनी मानले... एक शिक्षक झालेला विद्यार्थी प्रल्हाद पानगटवाड सर यांनी आपल्या प्रास्ताविकातून गुरु बद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या घडवण्याने मी आज घडलो ही भावना व्यक्त केली... वाघमारे यांच्या सविस्तर मार्गदर्शनाने ,बाळासाहेब पांडे सर यांनी सादर केलेल्या कवितेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले... यावेळी पुणे मुंबई,नाशिक,कोकण,आदी ठिकाणाहून आलेले २० ते ३० वर्गमित्र उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२८ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त शनिवार ३१ मे २०२५ रोजी सायं. ५ वा. कुसुम सभागृह, नांदेड येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तरी नागरिकांनी या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंतीवर्षा निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतीक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार यांची असून या कार्यक्रमास



मार्गदर्शन मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग विकास खारगे यांचे लाभले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ह्या केवळ राज्यकर्त्या नव्हत्या तर प्रजाहित दक्ष होत्या. त्यांनी अनेक घाट, मंदिरे जीर्णोद्धार, पाणपोई, धर्मशाळा इ. कामे केली आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ३१ मे रोजी नांदेड येथील कुसूम सभागृहात करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ३०० व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये लोककलाकार आपली कला सादर करणार आहेत. तसेच या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध लोककलाकार असतील.

## टि. सी. हरवली

माझी शिवम नरसिंग गनदलवार या नावाची इयत्ता १२ वी विज्ञान पास ची टी सी सोनखेड ते विष्णुपुरी येथे बस ने प्रवास करीत असताना सोनखेड बस स्टापवर गहाळ झाली आहे तरी कोणास मिळाल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**माझा पत्ता**
**नरसिंग जयराम गंदलवार रा. सोनखेड**
**मो.नं. ९७३०४४६०३७**

## टि. सी. हरवली

माझी वैशाली गोंविदराव वाघमारे या नावाची मुळ टि .सी . व इतर महत्वाचे कागदपत्र भोकर - नांदेड बस प्रवासात हरवली आहेत.

कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क**
**वैशाली गोंविदराव वाघमारे .**
**मो .९८२३०४१२९१**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## एकही आपत्तीग्रस्त मदतीपासून वंचित राहू नये - पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान आणि काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. या नुकसानीचे पंचनामे तातडीने सुरू करावेत आणि एकही आपत्तीग्रस्त व्यक्ती मदतीपासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. तसेच, मान्सून कालावधीत प्रशासनाने प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.



पालकमंत्री भोसले यांनी आज दूरध्वनीद्वारे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडून पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. जिल्हाधिकाऱ्यांनी मान्सूनपूर्व पावसामुळे झालेले पीक नुकसान, पशुहानी आणि जीवितहानी याबाबत माहिती दिली.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून अहवाल शासनाला सादर करावा, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. वीज पडून झालेल्या जीवितहानी आणि पशुधनाच्या नुकसानीबाबत नियमानुसार तातडीने मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

पीक नुकसानीचे पंचनामे करताना कोणताही बाधित व्यक्ती मदतीपासून वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, वीज पडून होणारी जीवितहानी टाळण्यासाठी नागरिकांनी पावसाळ्यात कोणती काळजी घ्यावी, याबाबत जनजागृती करावी, असेही त्यांनी नमूद केले.



### संक्षिप्त वृत्त...

## माता रमाई आंबेडकर यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
येथील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश



स्कूलमध्ये मंगळवारी माता रमाबाई आंबेडकर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

प्रारंभी श्रीकृष्ण लाटे, सुशील गोसावी, अजित कोकरे, आशितोष पाटील, सुप्रिया बारगजे यांच्या हस्ते माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी श्रीकृष्ण लाटे यांनी माता रमाबाई यांच्या जीवन कार्याला उजाळा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची उपस्थितांना माहिती दिली. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पुतळा विटंबनाप्रकरणी देवणीत रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
देवणी तालुक्यातील कोनाळी येथे शुक्रवारी झालेल्या पुतळा विटंबनाप्रकरणी आरोपींना शिक्षा व्हावी, चुकीच्या आरोपावरून लावण्यात आलेला अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा रद्द करावा, या मागण्यांसाठी सकल शिवप्रेमी बांधव व जिल्ह्यातील विविध संघटनांच्या पुढाकाराने देवणी येथील बोरोळ चौकात सोमवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रशासनाला निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी करण्यात आली.

कोनाळी येथील पुतळा विटंबनाप्रकरण गेल्या पाच दिवसांपासून चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी दाखल झालेला अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा चुकीचा आहे, तो गुन्हा रद्द करावा, पुतळा विटंबना प्रकरणात अटक झालेल्या आरोपीस तत्काळ जामीन मंजूर केल्याने प्रशासन आरोपीच्या पाठीशी असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शिवाय, सदर आरोपीस तडीपार करावे, या मागणीचे निवेदन तहसीलदार सोमनाथ वाडकर यांना देण्यात आले. यावेळी तहसीलदार वाडकर, पोलीस उपाधीक्षक डॉ. नितीन कटेकर, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गौड यांनी पंचायत समितीच्या सभागृहात ग्रामस्थ, आंदोलनकर्ते यांची बैठक घेऊन शांतता अबाधित ठेवण्यासाठी आवाहन केले.

दरम्यान, कोनाळी येथील प्रकरण योग्य पध्दतीने हाताळले गेले नाही, असा ठपका ठेवत देवणी ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक डोके यांची लातूर येथील पोलीस मुख्यालयात तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. त्यांचा पदभार पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आल्याचे पोलीस प्रशासनाने सांगितले.

## महावितरण सरळ सेवा भरती प्रक्रियेतील प्रतीक्षा यादी लवकरच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
महावितरणकडून सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे अभियांत्रिकी पदवीधारक (वितरण/स्थापत्य) ३४२ उमेदवारांची सहायक अभियंता पदासाठीची निवड यादी जाहीर करण्यात आली होती. या निवड यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी दरम्यान अपात्र व गैरहजर तसेच नियुक्तीपत्रातील विहीत मुदतीमध्ये रुजू न झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणात महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार प्रतीक्षा यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रतीक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल. महावितरणच्या जाहिरात क्र. ०७/२०२३ अन्वये अभियांत्रिकी पदवीधारक (वितरण-३०२ व स्थापत्य-४०) सहायक अभियंता पदाच्या ३४२ जागांसाठी सरळ सेवा भरती प्रक्रिया राबविली आहे.

# लातूरला मुसळधार पावसाचा तडाखा

## घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान; रस्त्यांना तळ्याचे स्वरुप





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
गेल्या पंधरा दिवसांपासून लातूर शहरासह जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये जोरदार मान्सूनपूर्व पाऊस सुरू आहे. त्यामुळे शहरातील रस्ते, सखल भाग आणि शेतशिवारात पाणीच पाणी झाले आहे. मंगळवारी दुपारी सुमारे दोन ते अडीच तास झालेल्या मुसळधार पावसामुळे लातूरकरांची चांगलीच तारांबळ उडाली. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. पावसामुळे अनेक ठिकाणचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने नागरिकांसह व्यापाऱ्यांची मोठी गैरसोय झाली.

लातूर शहरात मंगळवारी सकाळपासूनच पावसाच्या हलक्या सरी पडत होत्या. सर्वत्र काळेकुट्ट ढग दाटून आले होते.

सर्वत्र अंधाराची जाणीव होत होती. यातच दुपारी सव्वादोन वाजेच्या सुमारास जोरदार पावसाने हजेरी लावली. विजांच्या गडगडाटांसह मुसळधार पावसाने झोडपल्याने लातूरकरांची चांगली धावपळ झाली. अनेक सखल भागात पाणी साचले. रस्त्यांना नदी-नाल्यांचे स्वरूप आले आहे. प्रकल्प दुथडी भरून वाहत आहेत. शहरातील अनेक भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता. सर्वत्र ढग दाटून आल्याने शहरात अंधार निर्माण झाला होता. शहरातील जुने जिल्हाधिकारी कार्यालय समोरचा रस्ता, पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरचा अंबाजोगाई रस्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, नाना-नानी पार्क समोरचा रस्ता तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेसमोरील रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्ता, तसेच या चौकातील भुयारी मार्गातून साचणारे पाणी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकातील पडलेल्या पावसाला वाहून जायला गटार नसल्याने तेथील रस्त्यांना तळ्याचे स्वरूप येत आहे. यामुळे नागरिकांसह वाहनधारकांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत आहे.

### महापालिकेचा कारभार चव्हाट्यावर

लातूरमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून सातत्याने पाऊस सुरु आहे. मंगळवारी मात्र तुलनेने अधिक मुसळधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शहरातील रस्त्यांना नदी-नाल्याचे स्वरुप आले होते. अनेकांच्या घरांमध्ये पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते. घरांमधील जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घरांमध्ये शिरलेले पाणी अक्षरश: बकेटाच्या माध्यमातून घराबाहेर टाकण्याची पाळी नागरिकांवर आली. नालेसफाई करण्यात आली नसल्याने ही स्थिती उद्भवली. यातून महानगरपालिका प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. यामुळे नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

### दर तीन वर्षांनी पाणीटंचाई

मराठवाड्यातील लातूर हा कायम दुष्काळी असणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. दर तीन वर्षांनी या भागामध्ये पाण्याची मोठ्या प्रमाणात टंचाई असते. मागील अनेक वर्षांच्या कालावधीत यावर्षी प्रथमच थेट मे महिन्यातच पावसाला सुरूवात झाली आहे. मागील काही वर्षांचा इतिहास पाहिला तर लातूर जिल्ह्यात लवकर पाऊस झाल्यानंतर जून, जुलै मध्ये पावसाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते.

## माजी मंत्री देशमुखांनी केला विश्वरूप पवार याचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
रेणापुर तालुक्यातील गरसुळी येथील रहिवासी व पोद्दार इंटरनॅशनल स्कूल लातूर महाराष्ट्र येथील विश्वरूप सतीश पवार पाटील या विद्यार्थ्याने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९८. २० टक्के गुण घेऊन दैदीप्यमान यश मिळवले आहे



त्याच्या यशाबद्दल सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि डॉ. भोसले, नायगावचे सरपंच उद्धवराव शितोळे, अंकित नाडे, व्यंकटराव पाटील, शिरीष टेकाळे, तसेच गुड मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष शीलरत्न निलंगेकर ,शाहीर संतोष साळुंखे, संदीप शिरसाट, एक्सल प्रिंटरचे संचालक रंगनाथ चव्हाण, राजेश कोळी, व्यंकट कडणे ,विरेन कलेक्शनचे संचालक साईनाथ लोमटे, भागवतराव काकडे आदिंनी त्याला शुभेच्छा दिल्या.

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या लातूर जिल्ह्यातील २२ शासकीय कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचारी यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विभागस्तर आणि राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कार्यालयांमधील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संगीता टकले, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता देवेंद्र नीलकंठ, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त मंगेश शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

दुसऱ्या टप्प्यात झालेल्या मूल्यमापनात लातूर येथील ३ विभागस्तरीय कार्यालये आणि ४ जिल्हास्तरीय कार्यालयांनी राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागामध्ये लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक उपसंचालक कार्यालयाने राज्यस्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला.

पशुसंवर्धन विभागामध्ये लातूर येथील सहआयुक्त, पशुसंवर्धन यांच्या कार्यालयाने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच परिवहन विभागामध्ये लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला.

## आमदार रमेश कराड यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या जन्मदिनानिमित्त शुक्रवारी (दि.३०) लातूर ग्रामीण मतदारसंघातील गावागावांत ग्रामदेवतांना महाअभिषेक, महिला भजनी मंडळींना साडी-चोळीचे वाटप, रक्तदान शिबिर, पावसाळी छत्रीचे वाटप, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण यासह विविध कार्यक्रमांचे आमदार रमेश कराड मित्र मंडळाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे.



आमदार कराड यांच्या ३० मे २०२५ रोजीच्या जन्मदिनानिमित्त मतदारसंघातील गावागावात, वाडी-वस्तीमध्ये आमदार कराड यांचा जन्मदिवस उत्साहात आणि विधायक उपक्रमातून साजरा व्हावा यासाठी आमदार रमेश कराड मित्र मंडळाच्यावतीने नियोजन करण्यात आले आहे.

लातूर ग्रामीण मतदारसंघातील विविध गावागावांत, वाडीवस्तीतील ग्रामदेवतांची विधीवत महापूजा करून आमदार कराड यांना दीर्घायुष्य लाभो, यासाठी भाजपचे कार्यकर्ते, पदाधिकारी प्रार्थना करणार आहेत.

असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या रेणापूर येथील ग्रामदेवता आदिशक्ती श्री. रेणुकादेवी मंदिरात ३० रोजी सकाळी ९ वाजता आमदार कराड यांच्या हस्ते अभिषेक आणि आरती करण्यात येणार आहे. येथील अंबाजोगाई रोडवरील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील मुख्य इमारतीतील डोममध्ये सकाळी ११ वाजता अभिष्ठचिंतन सोहळा आणि मतदारसंघातील २०० महिला भजनी मंडळातील प्रत्येक मंडळास २० याप्रमाणे महिलांना साडी-चोळी वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. अभिष्टचिंतन सोहळ्यापूर्वी दोनशेहून अधिक लाडक्या बहिणीकडून आमदार रमेश कराड यांना औक्षण करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमांस उपस्थित रहावे, असे आवाहन आमदार रमेश कराड मित्र मंडळ आणि वाढदिवस संयोजन समितीतर्फे करण्यात आले आहे.

## विनोद चव्हाण यांना इंग्रजीमध्ये पीएचडी पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे शिक्षक आणि पत्रकार विनोद चव्हाण यांना सोमवारी इंग्रजी विषयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

विनोद चव्हाण यांनी रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. राजाराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अ स्टडी ऑफ ऐक्झिस्टन्सीयल क्रायसिस ऑफ विमेन इन द सिलेक्ट प्लेज ऑफ विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड अ‍ॅड. महेश दत्तानी या विषयावर विद्यापीठाला त्यांचा प्रबंध सादर केला होता.

प्रा. डॉ. सुहेल शेख यांनी बाह्य परीक्षक म्हणून काम पाहिले, तर प्रा. डॉ. पी. विठ्ठल परीक्षेचे चेअरमन म्हणून सहभागी होते. विनोद चव्हाण यांना मिळालेल्या पीएचडी पदवी बद्दल लक्ष्मीरमन लाहोटी, श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. पांडुरंग शितोळे, संशोधन मार्गदर्शक डॉ. राजाराम जाधव, जयप्रकाश दगडे, डॉ. काका धायगुडे, बालासाहेब यादव, प्रा. सुभाष भिंगे, डॉ. बाबासाहेब ठोंबरे, शरद झरे आदिंनी चव्हाण यांचे अभिनंदन केले.

## मान्सूनपूर्व अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महापालिका आयुक्त यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेत आढावा बैठक घेतली. मान्सूनपूर्व अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करण्यात यावेत, खरीप पेरणीसाठी बियाणे व खतांचा तुटवडा निर्माण होऊ नये, लातूर शहरासह जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करावा, आदी सूचना त्यांनी केल्या.




मागच्या काही दिवसांत लातूर शहर तसेच जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत. नुकसानग्रस्तांना तातडीने मदत करावी, जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालावा, अवैध वाहतूक रोखावी, अपघात कमी करण्यासाठी उपयायोजना कराव्यात, खरीप पेरणीसाठी बियाणे आणि खतांचा तुटवडा निर्माण होऊ नये. बोगस बियाणांची विक्री होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अतिवृष्टीमुळे लातूर शहर तसेच जिल्ह्यातील खराब झालेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी. नाल्यांची त्वरित साफसफाई करावी, शहरातील वीजपुरवठ्यातील अनियमितता दूर करून विजेचा लपंडाव बंद करावा. ड्रेनेज आणि इतर कामांसाठी खोदलेले रस्ते त्वरित दुरुस्त करावेत. सर्व रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत, आदी सूचना यावेळी माजी मंत्री आमदार देशमुख यांनी केल्या.

या बैठकीला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे. महापालिका आयुक्त देविदास जाधव, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, संगीता टकले, संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, शहर पोलीस उपाधीक्षक रणजीत सावंत, तहसीलदार सौदागर तांदळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता देवेंद्र नीळकंठ, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, महापालिकेचे शहर अभियंता नवनाथ केंद्रे यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचारी आणि काँग्रेसचे पदाधिकारी, आदी उपस्थित होते.

## खासदारांनी केली बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २८ मे -**
खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी शिरूर अनंतपाळ आणि शेजारच्या काही गावांतील अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीची व पिकाची बांधावर जाऊन पाहणी केली.

यावेळी शेतकऱ्यांनी अवकाळीने झालेल्या नुकसानीबाबतची माहिती खासदारांना दिली. खासदार डॉ. काळगे यांनी याबाबतची माहिती घेऊन शासनाच्यावतीने जी मदत देण्याची प्रक्रिया आहे, त्यासाठी पाठपुरावा करून मदत मिळवून देऊ, अशी ग्वाही दिली.

शिरूर अनंतपाळ व शेजारच्या काही गावांतील शेतशिवारात अवकाळी पावसामुळे केळी, टरबूज, कोथींबीर, आंबा, कांदा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची खासदार डॉ. काळगे यांनी पाहणी केली. महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याच्या सूचना यावेळी



उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी तहसीलदार गोविंद पेद्देवाड, अ‍ॅड. संभाजी पाटील शिरूर अनंतपाळकर, महादेव आवाळे, बसवराज मठपती, रामकिशन गड्डीमे, अशोक कोरे, व्यंकट हंद्राळे, गुरुनाथ आचवले, प्रमोद धुमाळे, तलाठी रामधन पाटील, बाबूराव तोरणे, आसिफ उजेडे तसेच महसूल, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते ७५० कोटींच्या विकास कामांचे उद्घाटन व भूमीपूजन

## रामलीला मैदानावर भव्य शेतकरी व महिला मेळाव्याचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ मे**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते दि २९ मे गुरूवारी हिंगोली पंचायत समितीच्या उद्घाटनासह सुमारे ७५० कोटी रूपयांच्या विकास कामांचे भूमीपूजन आणि उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच येथील रामलीला मैदानावर भव्य शेतकरी मेळावा व महिला मेळाव्याचे आयोजनही करण्यात आले आहे. या कार्यक्रमाची भाजपच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली असून रामलीला मैदानावर मागील आठ दिवसांपासून वॉटरप्रुफ सभामंडप टाकण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यामुळे भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गुरूवारी जिल्हा दौऱ्यावर येणार असून त्यांचेहस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन होणार आहे. येथील रामलीला मैदानावर दुपारी १.३० वाजता आयोजित शेतकरी व महिला मेळाव्याला ते संबोधित करणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, दुग्ध विकास मंत्री अतुल सावे, उर्जा राज्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे, पालकमंत्री नरहरी झिरवाळ, आ. गोपीचंद पडळकर, आ तान्हाजीराव मुटकुळे, आ. संतोष बांगर, आ राजु नवघरे, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा उज्ज्वला तांभाळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे आदींची उपस्थिती असणार आहे.

येथील तहसील कार्यालयाजवळ बांधण्यात आलेल्या सुसज्ज नवीन पंचायत समितीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेहस्ते होणार आहे. त्यानंतर हिंगोली शहरातील वाढीव नळ योजनेच्या बांधकामाचे भूमीपूजन केले जाणार आहे. शहरातील नवीन वसाहतींना पाणी पुरवठा करण्यासाठी आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी शासनाकडे पाठपुरावा करून वाढीव पाणी पुरवठा योजनेला मंजुरी मिळवली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत या नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामाला सुरूवात होणार असून शहरातील नवीन वसाहतीचा पाणीप्रश्न मार्गी लागणार आहे. याशिवाय हिंगोलीत नव्याने मंजूर झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन केले जाणार आहे.

पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या उद्घाटनानंतर पुढील काही दिवसातच नवीन इमारतीमधून कामकाजाला सुरूवात होणार आहे. त्यामुळे मागील १५ ते २० वर्षापासून जीर्ण झालेल्या इमारतीमधून कर्मचाऱ्यांची सुटका होणार आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

दुपारी १.३० वाजता येथील रामलीला मैदानावर भव्य शेतकरी व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्याची भारतीय जनता पक्षाच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली असून पावसाचा अंदोज पहाता रामलीला मैदानावर वॉटरप्रुफ सभामंडप टाकण्यात आला आहे. मागील आठवडाभरापासून येथील व्यासपीठाचा आढावा आ. तान्हाजीराव मुटकुळे स्वत: घेत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आगमनाने जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकासंदर्भात ते पदाधिकारी व कार्यकर्त्यांना काय कानमंत्र देतात याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, येथील रामलीला मैदानावरील सभास्थळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांनी पाहणी केली असून याठिकाणी तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**सभास्थळी ड्रोन उडविण्यावर प्रतिबंधात्मक आदेश**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची येथील रामलीला मैदानावर सभा होणार आहे. सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर सभा स्थळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे आणि जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी परवानगीशिवाय ड्रोन उडविण्यावर प्रतिबंध घालण्यात आला आहे. अधिकृत वेबसाईटवर नोंदणी करून उड्डाण परवानगी प्राप्त केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय व पोलिस अधीक्षक कार्यालयास परवानगीची प्रत परवानगी धारकाने सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यानिमित्त वाहतुक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ मे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दि २९ मे गुरूवारी हिंगोली दौऱ्यावर येणार असून रामलीला मैदान येथे सभा असल्याने जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने नागरिक सभेला येणार असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी येण्याची शक्यता असल्यामुळे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दि २९ मे रोजी दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत या मार्गावरील वाहतुकीमध्ये बदल केला असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन पोलिस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

रामलीला मैदान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शेतकरी व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला हजारोंच्या संख्येने ग्रामीण भागातून नागरिक येण्याची शक्यता आहे. त्यामुळे गर्दी होण्याची शक्यता आहे. परिणामी रहदारीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. या करिता सदर कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखणे करिता व कोणताही अनुचीत प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या करिता महाराष्ट्र पोलिस अधिनियमान्वये पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पिपल्स बँक ते इंदिरा गांधी चौक येणारी व जाणारी वाहतुक दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत पूर्ण पणे बंद राहील असे आदेश दिले आहेत तसेच रिसाला नाकाकडून शहरात येणारी एसबीआय बँक रोडने शहरात प्रवेश करतील तसेच नांदेड नाकाकडे जाणारे वाहने पिपल्स बँक तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा परिषद रोड नांदेड नाकाकडे जातील. नांदेडनाका कडून रिसाला नाका कडे जाणारे वाहने जिल्हा परिषद रोडने छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून रिसाला नाकाकडे जातील असे आदेश देण्यात आले आहेत.

# आदर्श महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ मे**



येथील आदर्श महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांनी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करीत अभिवादन केले.

स्टाफ सचिव डॉ. प्रा. सचिन हटकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्यांचा अल्प परिचय देताना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रातील नाशिकजवळील भगूर या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. ते थोर स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, लेखक, राजकारणी होते. त्यांच्या सागरा प्राण तळमळला, हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा, जयोस्तुते तानाजीचा पोवाडा ह्या कविता प्रचंड लोकप्रिय आहेत. या सह विविध कार्यांचा उल्लेख करत जयंतीदिनी परिचय देवून स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन केले.


स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी प्राचार्य डॉ. विलास आघाव डॉ.सचिन हटकर, मेजर पंढरीनाथ घुगे, कैलाश डिडाळे, जयवंत मुटकुळे, प्रवीण दुबे, तालीब पठाण, मुन्ना यादव, जीवन मोरे, गजानन गुंजकर, अशोक राखुंडे, अनिल मुदिराज, सुधीर बांगर, शेख जावेद,राजू व ठोंबरे बाई आदी उपस्थित होते.



**हिंगोली– राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज हिंगोलीत येणार असून येथील रामलीला मैदानावर भव्य शेतकरी व महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त भव्य सभामंडप उभारण्यात आला असून या सभामंडपाची पाहणी करतांना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी आदी. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### हिंगोलीत आज सामुहीक उपनयन संस्कार



हिंगोली– ब्राह्मण सभा हिंगोली सामुहिक उपनयन संस्कार शिबीर सोहळा समितीच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी सामुहिक उपनयन संस्कार सोहळ्याचे आयोजन आज २९ मे रोजी करण्यात आले आहे. यावेळी सहा बटुंवर उपनयन संस्कार सोहळा पार पडणार आहे. समितीच्या वतीने नांदेड बायपास वरील विशाल मंगल कार्यालयात २९ मे रोजी सकाळी १०.१५ वाजता सामुहिक व्रतबंध सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे या सोहळ्यात बटूंच्या निमंत्रित नातेवाईसाठी नाष्टा, शाही भोजन, अष्टवर्ग भोजन, मातृ भोजनाची व्यवस्था बटूंच्या मिरवणुकीसाठी रथ, बँड, फटाके, मंगल कार्यालयाची व्यवस्था, उपनयन संस्कार सोहळ्यासाठी सर्व पुजेचे साहित्य व पौराहित्य, बटूंच्या माता-पित्यांना समितीच्या वतीने आहेर करण्यात येणार आहे. या सोहळ्यानिमित्त समितीच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे.

### निवासस्थान परिसरात आढळला मणियार साप



हिंगोली– जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या निवासस्थानाच्या परिसरात विषारी असणारा मणियार जातीचा साप आढळला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. यावेळी उपस्थित कर्मचाऱ्याने सर्पमित्र बाळू डोके यांना संपर्क साधल्यानंतर त्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन मोठ्या शिताफीने या विषारी सापाला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडले. मणियार जातीचा दुर्मिळ आणि विषारी साप दिवसभर आराम करून रात्रीच्यावेळी शिकारीसाठी बाहेर पडतो, अशी माहीती सर्पमित्र बाळू डोके यांनी यावेळी दिली.

### चंद्रकला मंडले यांचे निधन

हिंगोली– शहरातील गवळीपुरा भागामधील चिन्नुलाल पापालाल मंडले (पहेलवान) यांच्या पत्नी सौ.चंद्रकलाबाई चिन्नुलाल मंडले (वय७५) यांचे २७ मे रोजी रात्री ११ च्या सुमारास निधन झाले. त्यांच्यावर २८ मे रोजी सकाळी ११ वाजता कयाधू नदीच्या तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती चिन्नुलाल मंडले यांच्यासह दोन मुले, तीन मुली, जावई नातवंड असा मोठा परिवार आहे.

# तहसील कार्यालयातून ट्रॅक्टर चोरून नेणाऱ्यास चोवीस तासात अटक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ मे**

येथील तहसील कार्यालयाच्या परिसरात जप्त केलेले वाळूने भरलेले ट्रॅक्टर चोरट्यांनी पळविल्याची घटना घडली होती. याप्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल होताच पथकाने सीसीटीव्ही फुटेजवरून माहीती घेत विदर्भातील दारव्हा डिग्रस येथून आरोपीला चोवीस तासात अटक केली असल्याची माहीती पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी दिली आहे.

तहसील कार्यालयाच्या पथकाने काही दिवसांपूर्वी अवैध वाळू उपसा करून वाहतुक करणारे एक ट्रॅक्टर पकडून तहसील कार्यालय परिसरात आणून उभे केले होते.या ट्रॅक्टर चालकाविरूध्द कारवाई करण्याची प्रक्रिया देखील पूर्ण करण्यात आली होती. परंतु चोरट्यांनी सदर ट्रॅक्टर वाळूसह पळविले. याप्रकरणी मंडळ अधिकारी नाईक यांनी दिलेल्या तक्रारीवरून शहर पोलिसात दि २६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोनि नरेंद्र पाडळकर, सपोनि संगमनाथ परगेवार, जमादार अशोक धामणे, धनंजय क्षीरसागर, संतोष करे, शेख मुजीब, गणेश लेकुळे, गणेश वाबळे, अझहर पठाण यांचय पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर डीबी पथकाने सीसीटीव्ही फुटेज पाहून माहीती घेण्यास सुरूवात केली. सदर ट्रॅक्टर विदर्भातील दारव्हा डिग्रस येथे असल्याची माहीती मिळताच पथकाने मंगळवारी रात्रीच दारव्हा डिग्रस गाठून शोध सुरू केला. यावेळी एका ठिकाणी ट्रॅक्टर आढळून आले. पोलिसांनी पंडीत पापणकर यास अटक केली.

# संभाजीराजे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी केली जनावरांची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ मे**



वाशिमकडून एका कंटेनरमध्ये म्हशींना निर्दयीपणे कोंबून, बांधूनकत्तलखान्याकडे नेत असल्याची माहीती धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना मिळाल्यानंतर या कार्यकर्त्यांनी कंटेनरचा पाठलाग करीत जवळपास ५२ म्हशींची सुटका करीत कंटेनर बासंबा पोलिसांच्या ताब्यात दिला आहे. याप्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

याबाबत अधिक माहीती अशी की, वाशिमकडून कंटेनर क्रमांक आरजे ११ जी सी ७३९२ मध्ये काही जनावरे निर्दयीपणे कोंबून बांधून त्यांना कत्तलखान्याकडे नेत असल्याची माहीती धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मिळाली. तत्काळ कार्यकर्त्यांनी सदरील कंटेनरचा पाठलाग केला. यावेळी या कंटेनरमध्ये सुमारे ५२ म्हशी निर्दयीपणे कोंबून त्यांच्या जीवीतास धोका होईल अशा परिस्थितीत आढळून आल्या. कार्यकर्त्यांनी सदरील कंटेनर बासंबा पोलिस ठाण्यात आणून सुमारे ५२ म्हशींची सुटका केली आहे. निर्दयीपणे कंटेनरमध्ये कोंबल्यामुळे त्यातील तीन म्हशींचा मृत्यू झाल्याची माहीती कार्यकर्त्यांनी दिली आहे. याप्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# शिवराज्यभिषेक सोहळ्याला हिंगोलीतून शिवप्रेमींनी सहभागी व्हावे



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २७ मे**

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने दुर्गराज रायगडावर ५ व ६ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी हिंगोली जिल्ह्यातून हजारों शिवप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन महोत्सव समितीचे सदस्य जमन मेटकर यांनी दिली.

शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने मंगळवार दि.२७ मे रोजी हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळा संदर्भात माहिती देण्यात आली. शिवराज्याभिषेक भारताच्या संस्कृतीदर्शनाचा,पराक्रमी इतिहासाचा उजळणीचा एक सोहळा व्हावा, यासाठी दुर्गराज रायगडावर दि.५ व ६ जून रोजी छत्रपती युवराज संभाजी महाराज व छत्रपती युवराजकुमार शहाजीराजे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवराज्याभिषेकसोहळापार पडणार आहे. या सोहळ्यासाठी हिंगोली येथुन हजारो शिवप्रेमी सहभाग होणार असुन दि.४ जून रोजी सायंकाळी ७ वाजता हिंगोली येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. त्यानंतर शिवप्रेमी रायगडकडे रवाना होणार असल्याची माहिती समितीचे सदस्य जमन मेटकर यांनी दिली आहे. स्वप्निल जाधव, ओमकार डोंबे, गजानन काळे, प्रमोद जाधव, राम शिंदे, विठ्ठल कदम, भागवत झाडे, विठ्ठल थोरात, कार्तिक मेटकर, विशाल मेटकर, शिवराज शिंदे, नितीन वाबळे आदींची उपस्थिती होती.

# पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी ७० वर्षाच्या वृध्दाचे आमरण उपोषण



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २७ मे**

जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील कहाकर बु. येथील गट क्रमांक ७७१ मधील शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी पूर्वीचा असलेल्या बैलगाडी रस्ता खुला करून द्यावा किंवा पर्यायी रस्ता देऊन शेतकऱ्यांची गैरसोय टाळावी यासाठी एक सत्तर वर्षिय वयोवृद्ध शेतकरी आपल्या कुटूंबासहीत तिसऱ्यांदा जिल्हाधीकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करत आहे. मात्र प्रशासनाने त्यांची अद्याप कुठलीही दखल घेतली नाही.

उपोषणाला बसल्यावर उपोषण मागे घेण्यास लाऊन सेनगाव तहसिल प्रशासन तारीख पे तारीख देऊन शेतकऱ्यांना टाळाटाळ करीत आहे. शेतरस्ता गाडी रस्ता आडवल्यावर फौजदारी गुन्हे दाखल करा असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व प्रशासनाला दिले होते. मात्र हिंगोली जिल्हा प्रशासनाकडून या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे दिसुन येत आहे. कहाकर बुद्रक येथील शेतकरी दत्ता जयराम गिरी, सिंधू दत्ता गिरी, डिगांबर जय रामगिरी, कावेरी दिगंबर गिरी यांनी वारंवार जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन सादर केले होते मात्र मागील अनेक वर्षापासून सदर शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. तहसीलदार यांनी रस्ता आडवणारे गैर अर्जदार दत्ता भिकाजी नागुलकर व विलास विठ्ठल नागुलकर यांचे सोबत संगनमत करून तहसिलदार यांनी रस्त्याची कुठलीही पाहणी न करता गट क्रमांक ७७१ पासुन सुमारे दहा किलो मिटर दुर अंतरावरील शिवरस्त्याचा येण्या जाण्यासाठी वापर करा असा चुकीचा आदेश पारित केला. पर्यायी रस्ता देऊन शेतकऱ्यांची गैरसोय दुर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.